ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जानेवारी २०१२ • मूल्य १० रुपये

## जीवनव्रती पुरस्कार



आशा बगे

## माध्यमांचं वर्तमान



**वाचकदिनी रंगलेला परिसंवाद**

भूमिका मांडताना **पद्मभूषण देशपांडे**

आणि सहभागी संपादक – **राजेंद्र साठे, गिरीश कुबेर, अभिराम भडकमकर, जयश्री खाडिलकर-पांडे, राजीव खांडेकर आणि विवेक गिरधारी**



# ठाणे ग्रंथाली वाचकदिन



'श्यामची आई'मधील एक प्रसंग साकारताना शालेय कलाकार




**प्रवीण बर्दापूरकर** यांच्या
**दिवस असे की...**
आणि
**नोंदी डायरीनंतरच्या**
**पुस्तकांचे मुंबई व नागपूर येथे प्रकाशन**

मुंबईतील प्रकाशनसमयी उद्धव ठाकरे, प्रवीण बर्दापूरकर आणि कुमार केतकर



नागपूर प्रकाशनसमयी प्रवीण बर्दापूरकर, राज ठाकरे, गिरीश गांधी, नितीन गडकरी आणि विनायक गोखले

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जानेवार २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक पहिला, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**
**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

सन २०१० संपून २०११ या वर्षाचं स्वागत रिवाजाप्रमाणे रोषणाईनं झालं होतं. मात्र या वर्षात जगात सर्वत्र रोषच प्रकट झाला. २०११ सरलं ते ट्युनिशियापासून भारतातील अण्णांच्या आंदोलनापर्यंत, विविध देशांत, वेगवेगळ्या प्रकारे, शासकांविरुद्ध झालेल्या उठाव-आंदोलनांनी. आपल्या राष्ट्रगीताची शताब्दी झाली, तीही याच वर्षात, डिसेंबरमध्ये. भारतीयच नव्हे, जागतिक जनगणांच्या मनात आजही असंतोष नांदतोय हे विदारक सत्य सरत्या वर्षानं दाखवलं. जनगणांचा संघर्ष चालूच आहे, बदलली फक्त साधनं. तो दाखवणाऱ्या माध्यमांची भूमिका नेहमीप्रमाणे दशांगुळे वर राहिली. भारतात अशक्त सरकार, अशक्त लोकपाल आणि अशक्त आंदोलन अशा अविवेकी प्रदर्शनात वर्ष संपलं.

'कोकणात वीज आली तर बघायचं काय, दारिद्र्यच ना!' असं 'पुल'कित अंतू बर्वा विचारतो. आज संगणकक्रांती, माध्यमं, संपर्कसाधनंही दाखवत काय आहेत, घडवत काय आहेत? अस्तित्वासाठी स्पर्धा आणि स्पर्धेसाठी जगणं हे वर्तमान घेऊन आपण नव्या वर्षात पाऊल टाकत आहोत. चांगल्या घटना घडतात, पण त्या क्षणिक असल्यानं 'चघळता' येत नाहीत. त्याचं प्रातिनिधिक उदाहरण म्हणजे, बाळासाहेब ठाकरे आणि आर.के. लक्ष्मण हे दोन भिन्न पिंडांचे, जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार प्रेमादरानं भेटले तो हृद्य क्षण, याच वर्षातला.

प्रवीण बर्दापूरकरांच्या दोन पुस्तकांचं प्रकाशन गेल्या महिन्यात झालं. त्यावेळी त्यांनी मीडियाची वाटचाल 'मिशन टू प्रोफेशन' झाली असल्याचं म्हटलं. खरं तर, 'हायर अॅण्ड फायर' हे शब्द ज्या क्रांतीनं रुजवले ते लक्षात घेता, प्रत्येक क्षेत्रातच, प्रत्येकाला आपला कार्यकाल 'प्रोबेशन' वाटत असतो, हे वास्तव आहे. मिशनच्या मागे 'विचार' असतो. प्रोफेशनच्या मागे नुसतं 'चक्र' उरलं आहे. याच कार्यक्रमात आजच्या स्थितीचं नेमकं वर्णन करताना कुमार केतकर म्हणाले, की 'आज रुजत असलेल्या तंत्रज्ञानाची योग्य कास धरली तर प्रसारमाध्यमांचं भवितव्य उज्ज्वल असेल. तिथे ब्रेकिंग न्यूज आणि सवंगतेला थारा नसेल.' थोडक्यात, मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांची समाजाभिमुख राहतानाची भूमिका महत्त्वाची ठरेल.

हाच धागा पकडून, 'माध्यमांचं वर्तमान' जाणून घेण्यासाठी एक परिसंवाद ग्रंथाली वाचकदिनी योजला होता. गिरीश कुबेर (लोकसत्ता), राजीव खांडेकर (स्टार माझा), राजेंद्र साठे (इ टीव्ही), विवेक गिरधारी (लोकमत, मुंबई आवृत्ती) आणि जयश्री खाडिलकर-पांडे (नवाकाळ) या आजच्या पिढीच्या संपादकांशी नाटककार अभिराम भडकमकर यांनी संवाद साधला. एका महत्त्वाच्या विषयाची ही चर्चा सरकार, धोरणं, सामाजिक संस्था/कार्यकर्ते, बदलतं अर्थकारण अशा अंगानं रंगली. तो पूर्ण वृत्तांत पुढील अंकी.

सन २०१२ रोषरहित असावं, ही सदिच्छा.

**– संपादक**

# जीवनव्रती

## प्रवीण बर्दापूरकर

नागपूर पत्रिका दैनिकाच्या ‘साकवि’ (‘साहित्य कला विज्ञान’चा संक्षेप) या रविवार पुरवणीची सूत्र यमुनाताई शेवडे यांच्या हाती होती. त्यांच्या हाताखाली रविवार पुरवणीचे काम मी आणि मंगल करत असण्याचे ते दिवस होते. पत्रकारितेत येऊन जेमतेम चार-पाच वर्षं झालेली, म्हणजे उमेदवारीचा काळ होता तो. माझा तर उमेदवारीच्या सुरुवातीच्या काळातच पणजी ते नागपूर व्हाया कोल्हापूर, सातारा, चिपळूण आणि मुंबई असा प्रवास झालेला. त्यामुळे मी कुठेच स्थिर झालेलो नव्हतो. साहजिकच सतत कोणा न कोणावर अवलंबून राहावे लागत असे. यमूताई शेवडे यांच्या लाडक्या लेखकात तेव्हा आशा बगे यांचे नाव अग्रक्रमाने होते. दिवाळी अंकासाठी त्यांची कथा मागायला मी मंगलसोबत गेलो होतो त्याला आता सव्वातीन दशके सहज उलटून गेली आहेत... तेव्हा नागपूर-विदर्भाच्या सांस्कृतिक क्षेत्रातील ज्येष्ठाच्या नावासोबतच सुरेश भट, महेश एलकुंचवार, ग्रेस, भास्कर लक्ष्मण भोळे, वसंत आबाजी डहाके, यशवंत मनोहर, सुरेश द्वादशीवार यांच्या नावाचे नगारे महाराष्ट्रात वाजायला सुरुवात झालेली होती. या सर्वांच्या तुलनेने वयाने लहान असूनही नारायण कुळकर्णी-कवठेकर याच्या कविता सत्यकथेत प्रकाशित होत असल्याने आणि गारुड करणाऱ्या वक्तृत्व शैलीमुळे राम शेवाळकर यांचीही नावे चर्चेत होती. कोणत्याही प्रादेशिक मर्यादा न येता आणि न मानता स्वकर्तृत्वाने ही मंडळी



**विदर्भ साहित्य संघाचा सर्वोच्च ग.त्र्यं. माडखोलकर जीवनव्रती सन्मान नुकताच ज्येष्ठ कथालेखिका आणि कादंबरीकार आशा बगे यांना जाहीर झाला आहे. त्यांना हा सन्मान १४ जानेवारीला प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त-**

महाराष्ट्राच्या साहित्यप्रांती दीर्घकाळ तळपणार याची खात्री झालेली होती. यात एक अग्रक्रमी नाव आशा बगे यांचं होतं. त्यामुळे त्यांना भेटण्याची उत्सुकता अर्थातच होती. आशा बगे यांची भेट झाली आणि ‘माय-मावशी’च्या नात्यातले कोणीतरी भेटलं अशी जी भावना तेव्हा झाली ती आजही कायम आहे. खरे तर, ओळख, मैत्रीवर असे नात्याचे कवच निर्माण होऊ द्यायला म्हणा की घालायला म्हणा, माझा कायम नकार असतो. मैत्री आणि नाते यांची सरमिसळ होऊ देता कामा नये, कारण या दोन्हीची खोली आणि तीव्रता भिन्न असते, भावनात्मक पातळी वेगळी असते, असे माझे ठाम मत आजही आहे; तरीही लीलाताई चितळे, आशा बगे आणि जया द्वादशीवार याला अपवाद आहेत.

कथा मिळण्याबाबत बोलणी झाल्यावर आशा बगे मंगलला म्हणाल्या, ‘अगं, पण माझं अक्षर समजेल नं कंपोझिटरला? आपले अक्षर चांगले नाही हे सांगण्यातही इतका निरागसपणा होता, की तो मला खूपच भावला. हे असे निरागस असणे हे आशा बगे यांचे एक खास वैशिष्ट्य, ते त्यांनी आजवर जपलं आहे. ‘जीवनव्रती’ पुरस्कार मिळाल्यावर आम्ही भेटायला गेलो तेव्हा स्मितास्मृती अंकासाठी पाठवलेला लेख छानच झालाय हे मी सांगितले तर त्या पाठवलेल्या लेखाचे अक्षर समजले की नाही हा त्यांचा प्रश्न पहिला होता आणि ते सांगतानाचा निरागसपणा तो तसाच कायम होता. मग मौजचे राम पटवर्धन यांनी त्याचे अक्षर समजण्यासाठी काय काय केले ते सांगण्यात आशाताई रंगून गेल्या. साहित्यक्षेत्रातील राजकारण आणि राजकारणातील उलाढाली याबाबत आशाताईना गम्य नसते, त्यावर काही बोलणं

सुरू असलं की ते सगळं त्यांना नवीन असतं 'हो, का?' मला बाई त्यातलं कसं काहीच ठाऊक नाही, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेला असतो. त्यांच्या वर्तन आणि व्यवहारातल्या स्पष्ट नितळपणाला हे असे असणे एकदम साजेसे असते.

आशा बगे जन्माने आणि आजवरच्या जगण्याने अस्सल नागपूरकर आहेत. (अर्थात मधली वर्षे अकोल्यात वास्तव्य झाले हा अपवाद आहेच म्हणा) महालातल्या देशपांडे कुटुंबात त्यांचा जन्म झाला. दक्षिणामूर्ती चौकातले हे देशपांडे प्रख्यात. त्यांचे आजोबा विश्वनाथ देशपांडे यांना इंग्रज सरकारने 'सर्' ही पदवी दिलेली होती. त्यांचे वडील वामन विश्वनाथ देशपांडे त्या काळातले प्रख्यात वकील होते, त्यांना अण्णासाहेब म्हणत. चतुर वकील अशी त्या काळात ओळख होती. श्रीमंत बाबुराव देशमुख आणि देशपांडे कुटुंबीय साहित्य आणि कलेचे केवळ चाहतेच नव्हते तर आश्रयदाते होते. श्रीमंत बाबुराव देशमुख हे तर रसिकाग्रणीच!पु. ल. देशपांडे, भीमसेन जोशींपासून अनेकांच्या मैफली त्यांच्या घरी रंगत. आशाताईवर संगीताचा पहिला संस्कार इथेच झाला आणि शब्दांनी त्यांच्या मनात मूळ धरलं ते इथेच. आईकडून संगीताचा हा संस्कार पुढे वैपुल्याने विस्तारत गेला. पुढे शब्दांच्या दुनियेत आशाताईंनी ऐसपैस मुशाफिरी केली आणि संगीताने त्या मुशाफिरीवर सावली धरली. आशाताईंच्या लेखनात संगीताचे जे संदर्भ अनेकदा येतात त्याचे उगमस्थान इथे आहे. ५९ साली संगीत हाच विषय घेऊन एम.ए.ची पदवी त्यांनी सुवर्णपदकासह प्राप्त केली. एलएडी हे त्याचे महाविद्यालय आणि विद्यापीठ नागपूर.

आशाताईंच्या लेखनाची जातकुळी जन्मजात अभिजात आहे. त्यात मानवी नात्यांचा शोध असतो, त्यातील पीळ असतो, पेच असतो. ते सारे वाचताना एक वेगळे भावविश्व आपल्यासमोर अलवारपणे उलगडत जाते; त्या भावविश्वात आपणही गुंतत जातो. ते भावविश्व आपलंच आहे ही जाणीव अनेकदा सख्खी होते, इतके ते आपल्याशी नाळेचे नाते सांगते. आशाताईची सर्जनशीलता संयततेची साथ मात्र कुठेच सोडत नाही. भावनांचा कल्लोळ मोठा होत जातो, पण त्याचा उद्रेक होत नाही, विद्रोहाच्या वाटेवर तर तो चालतच नाही. आशाताईंच्या शालीन व्यक्तिमत्त्वाला हे साजेसे असते. हा मजकूर लिहीत असताना जाणवलं, आशाताईंच्या लेखनाच्या प्रेरणा कोणत्या, त्यांच्या लेखनाची निर्मितीप्रक्रिया कशी असते वगैरे समीक्षकी थाटाचे प्रश्न आपण त्यांना कधी विचारलेच नाहीत, इतके त्यांच्या लेखनात आपण गुंतून गेलो, त्या लेखनाचा एक भाग झालेलो आहोत.

आशाताईंचे वागणे आणि व्यवहार एकदम सोज्वळ. नागपूरकरांनी त्यांना कायम पाहिले ते सोज्वळच. डोळे दिपवणाऱ्या अलंकारात आकंठ सजलेल्या आणि भपकेबाज वस्त्रे परिधान केलेल्या आशाताई नागपूरकरांना ठाऊक नाहीत कारण असं त्यांना कधी कुणी पाहिलेलेच नाही. मंदिरात नुकतीच पूजा झालेली असावी, फुलं आणि धूप-उदबत्तीचा गंध दाटून आलेला असावा, सूर्याला ढगाआड करणारा नेमका श्रावण महिना असावा... अशा वातावरणांत समईच्या सर्व ज्योती उजळलेल्या असाव्यात... किंचित अंधारल्या त्या दिवसात समईचा तो प्रकाश खूप आश्वासक वाटतो. नास्तिकालाही तो गंध, तो प्रकाश प्रसन्न करतो, ते वातावरणच उमेद देणारे असते, निराशा झटकून टाकणारे असतं. समईच्या त्या प्रकाशासारखा वडीलधारा आश्वासक वावर आशाताईंचा असतो. सार्वजनिक कार्यक्रमातला त्यांचा वावर आणि वर्तनही अतिशय साधं. त्या एवढ्या मोठ्या लेखिका असल्याचा तोराच नाही तर मग आव तरी असणार कुठे? कार्यक्रमस्थळी त्या आल्यावर त्या सस्मितच दिसणार आणि ओळखीच्यांना भेटणार. पहिल्या रांगेत तर बसणारच नाहीत, दुसऱ्या-तिसऱ्या किंवा क्वचित चौथ्याही रांगेत त्या विराजमान होणार. कार्यक्रम संपल्यावर पाहुण्याला (त्याचे भाषण कितीही टपराट झालेलं असलं तरी) त्याचा सन्मान कायम ठेवत, भाषणाची स्तुती करत भेटणार आणि मगच कार्यक्रमस्थळ सोडणार. त्यांना न ओळखणाऱ्याला आपण इतक्या ग्रेट लेखिकेला भेटतो आहोत, बघतो आहोत याची जाणीवही त्यांच्या बॉडीलँग्वेजमध्ये नसते. सन्मान साहित्य अकादमीचा असो की आत्ता विदर्भ साहित्य संघाचा जाहीर झालेला सर्वोच्च जीवनव्रती असो, तो जाहीर झाल्यावर तोच शांत नम्रपणा. जीवनव्रती सन्मान ग.त्र्यं. माडखोलकरांच्या नावे असून आणि यापूर्वी तो ना.घ. देशपांडे, सुरेश भट, ग्रेस आणि महेश एलकुंचवार यासारख्यांना मिळालेला आहे यावरून त्याचे वजन लक्षात यावे, आशाताई मात्र आजच्या पिढीच्या भाषेत सांगायचे तर एकदम कूल!

आपल्याला भाषण करता येत नाही ही आशाताईची स्वयंघोषित धारणा आहे. अशी कोणतीही स्वयंघोषित धारणा एकदा चिलखत म्हणून धारण केली की स्वत:ची प्रायव्हसी मस्त जपता येते, हा फार मोठा फायदा आहे. 'मला नाही बाई सलग चारही मिनिटं बोलता येत' असं सांगत कार्यक्रमाचं प्रमुख पाहुणेपद, अध्यक्षपद नाकारण्याची कला त्यांनी मस्त संपादन केलेली आहे. त्यांना भाषण करता येत नाही यात खरे तर काहीच तथ्य नाही. मी त्यांची काही भाषणं ऐकली आहेत-कव्हर केली आहेत पण, ते जाऊ द्या, अगदी अलीकडचा एक प्रसंग सांगतो-महेश एलकुंचवार यांच्या नागभूषण अवार्ड वितरण कार्यक्रमाला अध्यक्ष राजकीय नेते होते आणि अपरिहार्य राजकीय अडचणीमुळे त्यांना कार्यक्रमाला दांडी मारावी लागली. ऐनवेळी अध्यक्षपद आशाताईंना भूषवावे लागले; म्हणजे तशी गळच त्यांना घातली गेली. अंगभूत भिडस्तपणामुळे आणि एलकुंचवारांप्रती असलेल्या आस्थेमुळे त्यांना नाही म्हणता आलेच नाही. मुकाबला एलकुंचवार आणि कुमार केतकर यांच्यासारख्याशी होता, पण अवघ्या साडेचार-पावणेपाच मिनिटांच्या

भाषणात आशाताईंनी सर्वांची मने जिंकली. त्याचे भाषण मनाच्या गाभाऱ्यातून आलेले होते, त्यामुळे साहजिकच ते सर्वांना भावले. पण, भाषण करता येत नाही हे त्या प्रांजळपणे सांगताहेत याची इतकी खात्री समोरच्याला पटते की तो स्वत:हूनच पाहुणेपद किंवा अध्यक्षपदाच्या ऑफरपासून माघार घेतो!नेमकं हेच कारण पुढे करत आशाताई अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या धुराळ्यापासून स्वत:ला लांब ठेवत आहेत. खरं तर, केवळ साहित्यक्षेत्रातील नाही तर एकूण सर्वच राजकारणापासून त्यांना लांब राहायचे आहे याची जाणीव त्यांना असा आग्रह करणाऱ्या सर्वांना आहे पण, एखाद्या वेळी त्या आग्रहाला बळी पडतील अशी भाबडी आशा बाळगायला काय हरकत आहे?


आशाताई संभाषणही छान करतात. छान म्हणजे आपल्या कानाला आणि मनालाही तृप्त करेल अशा शब्दात. एखादी बातमी त्यांना सांगितली किंवा त्यांच्या एखाद्या मजकुरावर किंवा भाषणावर प्रतिक्रिया दिली तर त्या कशा उत्तरतील किंवा आपल्या भाषण-परफॉर्मन्सवर त्यांची प्रतिक्रिया कशी असेल यावर मी आणि माझी पत्नी मंगल बऱ्याचदा अंदाज बांधण्याचा खेळ खेळतो. अनेकदा आमची मैत्रीण आणि ज्येष्ठ कवयित्री अरुणा ढेरेही त्यात असते. बरं त्या जे काही बोलतात त्यात कृत्रिमता मुळीच नसते. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर;मध्यंतरी हितवाद या इंग्रजी दैनिकात विजय फणशीकर याने आशाताईंवर कशाच्या तरी निमित्ताने छानसा लेख लिहिला. या इंग्रजी दैनिकाचा विजय संपादक आहे. आशाताईंना हे सांगण्यासाठी फोन करण्याआधी मी म्हणालो, 'तुमचा निरोप कसा मंदिरातल्या घंट्या किणकिणल्या-सारखा वाटला' असं म्हणणार आशाताई आणि घडलं अगदी तस्सच. कवितेचा कार्यक्रम संपल्यावर त्या अरुणा ढेरेला म्हणणार, 'किती छान गुणगुणल्यासारख्या सादर केल्या गं तू कविता, माझी तर तुझ्यावरून नजरच हटली नाही बाई', आणि मग आपल्याला मनातले तेच आशाताई कशा बोलल्या याचे आम्हाला समाधान वाटणार. असे छानसे बोलत-वागत त्या जगत असतात, लिहीत असतात. त्यांच्या लेखनातून आपल्याला आनंद देत असतात. त्यांच्या स्वभावात काही उणे-दुणे नाही असा दावा नाहीच पण, त्यापेक्षाही त्यांच्या लेखनातून मिळणारा आनंद कितीतरी जास्त आहे, मोठा आहे. माडखोलकरांच्या नावाने दिला जाणारा जीवनव्रती सन्मान मिळाल्या-बद्दल आशाताईंचे अभिनंदन करायचे ते त्यांनी दिलेल्या याचे आनंदासाठी.


यापुढे आणखी मोठ्या सन्मानासाठी आशाताईंना शुभेच्छा.

**- प्रवीण बर्दापूरकर**
एल-९०, वसंतनगर,
लक्ष्मीनगरजवळ, नागपूर - ४४००२२
भ्रमणध्वनी : +९१ ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com

**प्रवीण बर्दापूरकर** यांची प्रकाशित झालेली दोन पुस्तके

**दिवस असे की...**
**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**




**नोंदी डायरीनंतरच्या**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**


# मानवशास्त्रज्ञ ग्रंथकार डॉ. श.गो. देवगावकर

## प्राचार्य मदन धनकर

तत्कालीन नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचं तिसरं अधिवेशन आनंदवन इथे १९७२ साली भरलं होतं. उद्‌घाटक श्रेष्ठ विचारवंत प्रा. गं.बा. सरदार होते. अधिवेशनानंतर सरदारांनी डॉ. श.गो. देवगावकर यांना महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या कार्याशी जोडून घेतलं. डॉ. देवगावकर आनंद निकेतन महाविद्यालय राज्यशास्त्र विभागप्रमुख होते. सरदारांची ही निवड अनेकांसह मलाही चकित करून गेली. आज माझं आश्चर्य चांदीचे पंख लेऊन स्थिर झालं आहे. गेल्या ४० वर्षांत डॉ. देवगावकर यांचं विद्वानांनी मान्य केलेलं लेखन-संशोधन थक्क करणारं आहे.

'महाराष्ट्रातील निवडक जाती-जमाती' हा त्यांचा ४५० पृष्ठांचा ग्रंथ दोन वर्षांपूर्वी प्रकाशित झाला. यात मानवशास्त्रीय अभ्यासातून संकलित केलेली महाराष्ट्रातील निवडक १०५ जाती-जमातींची माहिती आहे. शतकांच्या अंतरानं मागासवर्गीय राहिलेल्या मानवसमूहाला प्रगतीची शिदोरी लाभावी आणि न्यायानं जगण्याची संधी मिळावी म्हणून आरक्षण आलं. भारतीय राज्यघटनेनं दिलेल्या निर्देशक तत्त्वानुसार आरक्षण सुरू आहे. त्यामुळे आरक्षणासाठी आपल्या जातींचा समावेश व्हावा यासाठी माना व हलबा यांसारखे संघर्ष करीत असून हलबा व माना म्हणून मान्यता मिळण्यासाठी काहींचा प्रयत्न आहे.

अनुसूचित जाती-जमाती, भटक्या व विमुक्त जाती यांच्यात समावेश व्हावा म्हणून अनेक जातींचा प्रयत्न आहे. अन्य मागासवर्गियांची जनगणना वेगळी व्हावी



डॉ. श.गो. देवगावकर

अशी मागणी देशापुढे आहे. हा विषय गुंतागुंतीचा असून अनेकांसाठी अस्मिता रक्षणाचा आहे. न्यायाचे प्रश्न भावनांच्या आधारे सोडवता येत नाही. शतकांच्या परंपरांनी आखलेला अभ्यास, जागतिक परिमाणांचा स्वीकार करून पूर्वसुरींनी केलेलं अभ्यास-संशोधन आणि केवळ स्वत:वर भरवसा ठेवून केलेला क्षेत्रअभ्यास यांच्या बळावर पुढं जाता येतं. डॉ. देवगावकर यांनी आपल्या ग्रंथातून हे सत्य घासुनपुसून पुन्हा एकदा मांडलं आहे.

विश्वसनीय ग्रंथांचा अभ्यास, संशोधन पद्धतीचा अवलंब, आणि क्षेत्रीय अभ्यासाची भ्रमंती अशा त्रिकोणात डॉ. देवगावकर यांनी आपला अभ्यास मांडला आहे. भारत सेवक समाजाचा कार्यकर्ता म्हणून विद्यार्थी असताना ते राबले. चिखलदरा येथील एक महिन्याचं समाजसेवा शिबीर १९५८ साली खूप गाजलं. त्या शिबिराचे ते सचिव होते. पं. नेहरू व गुलझारीलाल नंदा यांचं पाठबळ घेऊन संस्था पुढे गेली. लगेच, १९५९ साली भोपाळ इथे तेथील शिक्षणमंत्री डॉ. शंकरदयाल शर्मा (पुढे राष्ट्रपती झाले) यांचं मार्गदर्शन त्यांना लाभलं. त्यामुळे अभ्यासाची ऊर्मी जागी झाली.

डॉ. देवगावकर यांचा आदिवासींचा (अनुसूचित जमातींचा) क्षेत्रअभ्यास वसंत पटवर्धन यांच्या मदतीनं सुरू झाला. विद्यमान गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी इथे वसंतराव आपले वडिल रेव्हरंड पटवर्धन यांच्यासोबत कार्यरत होते. वसंतराव पटवर्धन अहेरी जमीनदारीत वनक्षेत्राधिकारी होते. त्यांचा मुलगा मोहन यांचा माझ्याशी अहेरी येथे प्राचार्य असताना परिचय झाला. मोहननं गोंडी-माडिया-मराठी असा शब्दकोश तयार केला. वसंतराव पटवर्धन यांनी आदिवासी क्षेत्रातील सेवाकार्याची दीक्षा रेव्हरंड फादर एल्विन यांच्यापासून घेतली. ईशान्य भारत व मध्यप्रदेशात काम करताना एल्विन यांनी धर्मप्रसाराचं कार्य सोडून आदिवासींची सेवा पत्करली. त्यानंतर ते डॉ. वेरियर एल्विन म्हणून ख्यात झाले. भामरागड परिसरातील पहाडावर वास्तव्य असलेल्या बडा माडियांची ११ गावं स्थलांतरित शेतीचा प्रयोग करून शासनानं पुन्हा पायथ्याशी वसवली. त्यासाठी वसंत पटवर्धन यांनी काम केलं.

शिबिरातील श्रमदानासाठी फावड्यावर एक हात असतानाच डॉ. देवगावकर प्राध्यापक झाल्यावर दुसरा हात ग्रंथावर स्थिरावला. गेल्या ४० वर्षांत डॉ. देवगावकर यांचे ३० ग्रंथ प्रकाशित झाले. त्यात १७ इंग्रजीत असून प्रामुख्यानं

आदिवासी जमातीवर आहेत. वरोरा इथे आनंद निकेतन महाविद्यालयात आल्यावर बाबा आमटे यांचा सहवास लाभला. आनंदवनातील परदेशी पाहुण्यांशी आदिवासींबद्दल चर्चा करण्यासाठी प्रामुख्यानं डॉ. देवगावकर असत. मानवशास्त्र व समाजविज्ञानशास्त्र यांचा अभ्यास त्यांनी चालू ठेवला. ब्रिटिश व भारतीय अभ्यासकांनी लिहिलेल्या ग्रंथाचा अभ्यास केला. महाराष्ट्रातील अनेक आदिवासी जमातींची तसेच निवडक जातींची सूत्रबद्ध माहिती घेताना त्यांचं निवासस्थान, स्थलांतराचा इतिहास, भौतिक प्रगती, समाज संघटन, जीवनचक्र, विधी, धर्म संकल्पना, देवदेवता आणि व्यवसाय यांत होणारे बदल साक्षेपी अभ्यासानं टिपले.


व्यासंग म्हणजे केवळ अध्ययनाचं फलित नव्हे. शास्त्रीय दृष्टी बाळगून केलेल्या अभ्यासाला चिकित्सेचं परिमाण लाभतं तेव्हा प्राप्त निष्कर्ष व्यासंगाची महत्ता सिद्ध करतात. भारतासारख्या खंडप्राय देशात अभ्यासासोबत लोकजीवनात समरस होऊन सामाजिक घुसळण करण्याची तयारी लागते. त्यासाठी अनाघ्रात प्रदेश तुडवण्याची पायपीट करावी लागते. प्रा. डॉ. देवगावकर यांनी ती केली आहे. अध्ययन-संशोधनात भारतीय अस्मिता लक्षात घेण्याची कुवत जशी लागते, तशी वेळोवेळी राज्यकर्त्यांनी केलेले रचनात्मक कार्य व तोडफोडदेखील विचारात घ्यावी लागते. त्याशिवाय सतत गुंतत जाणाऱ्या सार्वजनिक जीवनाचं वास्तव लक्षात येत नाही. न्यायाचा प्रश्न मुख्य मुद्दा होतो तेव्हा गुंताच मोकळा करावा लागतो. जात, धर्म, भाषा व क्षेत्र किंवा प्रदेश यांच्या अस्मिता सांभाळून न्यायाची पायरी बांधावी लागते. त्यासाठी समाजविज्ञानशास्त्रं केवळ समजून घ्यावी लागत नाहीत तर त्यांची फेरमांडणी करावी लागते. समाजनिष्ठा व संशोधनातून गवसलेले निष्कर्ष स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागते. समाजाच्या विधायक बांधणीसाठी आवश्यक निष्कर्ष काढण्याची क्षमता असलेला मानवशास्त्रज्ञ डॉ. देवगावकर यांच्या रूपानं विद्यमान आहे.

पारंपरिक भारतीय समाज स्वायत्त गावगाडा, जात व एकत्र कुटुंबपद्धती या तीन संकल्पनांवर आधारीत आहे. भारतात १८७१ सालापासून जनगणना सुरू झाली. विल्यम क्रुक यांचा १८९६ मध्ये प्रकाशित The tribes and castes of the North-Western Provinces and Aunth (Vol.-1-4) किंवा रसेल व हिरालाल यांची १९०६ मध्ये प्रकाशित कास्ट्स अॅन्ड ट्राइब्ज ऑफ सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अॅन्ड बेरार, (खंड १-४) या ग्रंथापासून या दिशेनं सुरू असलेल्या अभ्यासाचं दर्शन होतं. यानंतर १९०८ पासून शासनानं प्रकाशित केलेले गॅझेटिअर्स व पुढे इरावती कर्वे यांचा 'महाराष्ट्र अॅण्ड इट्स पीपल' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. डॉ. देवगावकर यांचा ग्रंथ गेल्या शंभर वर्षांच्या संशोधनावर आधारीत आहे. महाराष्ट्रातील निवडक जाती-जमातींसंबंधी लिहिण्यापूर्वी त्यांनी २२ पृष्ठं जाती-जमातींचा अभ्यास, जातपडताळणी यावर लिहिली आहे. व्यवहारात विवाद्य ठरलेला भाग लिहून यांनी केवळ हिंमत दाखवली नाही तर याबाबत विश्वासार्ह पाऊल टाकलं आहे.


ग्रंथाच्या शेवटी महाराष्ट्रातील काही जाती-जमातींची मापं व प्रमाणं दिली आहेत. महाराष्ट्रातील विविध जाती-जमातींच्या मूळ निवासस्थानांचा तक्ता दिला आहे. त्यानंतर विविध जाती-जमातींच्या आरक्षणाची सूची आणि व्ही.जे.एन.टी.-ओ.बी.सी. व एसबीसी यांची २५ जून २००८च्या शासन निर्णयापर्यंतची अद्ययावत यादी दिली आहे. इतर सर्व मागासवर्गांची यादी, विशेष मागास प्रवर्ग व महाराष्ट्रातील अनुसूचित जाती यांची यादी भिन्न परिशिष्टातून आरक्षणाच्या टक्केवारीसह दिली आहे. अनुसूचित जमातीचीही अशी यादी आहे. सार्वजनिक उपयोगितेच्या कसोटीवर हा ग्रंथ लोकांसमोर आहे.

डॉ. देवगावकर यांनी अनेक उच्च शासकीय समित्या व आयोग यांच्यावर दीर्घकाळ काम केलं. उच्च न्यायालयाने न्यायमूर्ती आणि डॉ. रावसाहेब कसबे व डॉ. हरी नरके यांच्याशी समित्यांमध्ये त्यांचा अनेकदा अर्थपूर्ण व संस्मरणीय संवाद झाला. आठव्या पंचवार्षिक योजनेतील अनुसूचित जाती-जमाती यावरील तज्ज्ञ गटाचे सदस्य



## शरद बेडेकर यांची पुस्तके नव्या स्वरूपात




**ईश्वरविरहित जीवन खंड १**
मूल्य १८० रु.
सवलतीत १०० रु.




**ईश्वरविरहित जीवन खंड २**
मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.




**विचारवंतांचा विवेकविशेष**
मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.

म्हणून त्यांनी काम केलं. महाराष्ट्र शासनातर्फे १९९९ मध्ये एक पाच-सदस्य अभ्यास मंडळ गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेश राज्यांच्या आदिवासी भागात दौरा करून शिफाराशी करण्यासाठी पाठवण्यात आलं. त्यात सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. २००४ पासून महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगावर सदस्य म्हणून काम केलं. विविध जातींच्या आरक्षणासंबंधींच्या मागण्या व प्रवर्ग बदल करण्याबाबत उपस्थित प्रश्नांचा त्यांनी अभ्यास अहवाल दिला. त्यात मानवशास्त्र व समाजशास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला होता. अहवालांना संशोधन प्रकल्पाचं स्वरूप देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

भारतीय आदिम जाती सेवा संघाचे आजीव सदस्य म्हणून काम करताना ते नागालँडमध्ये राहिले. म. गांधींच्या प्रेरणेनं ठक्करबाप्पांनी ही संस्था स्थापन केली. त्याचं संवर्धन दिवंगत पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी केलं. आओ नागांशी त्यांनी यावेळी संवाद साधला. पुढे कोकणा आदिवासीमध्ये त्यांनी काम केलं. या दोन्ही कार्यात त्यांच्या पत्नी डॉ. सौ. शैलजा देवगावकर सहभागी होत्या. पं. नेहरूंच्या जन्मशताब्दीनिमित्त नवी दिल्ली येथील विज्ञानभवनात आयोजित दहाव्या आंतरराष्ट्रीय मानववंशशास्त्र व मानवशास्त्रीय परिषदेत उभयतांनी भाग घेतला. भारत सरकार आदिम जाती सेवा संघ व अन्य तीन संस्थांनी तीनमूर्ती भवन इथे आयोजित परिषदेत उपस्थित राहून भाग घेतला.

'द माडिया ऑफ भामरागड', 'द हिल कोरवा', 'द कोरकू ट्रायबल्स', 'द बंजारा', 'द 4 ट्रायबल्स कोलाम, कातकरी, कोळी व कोकणा' ही त्यांनी लिहिलेली इंग्रजी पुस्तकं आदिवासींच्या अभ्यासाची महत्त्वाची साधनं ठरली आहेत. 'द कोलाम ट्राइब्ज' व 'गोंडस ऑफ विदर्भ' ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख जनजातीवर स्वतंत्र पुस्तकं लिहिणारे ते एकमेव ग्रंथकार आहेत. 'आदिवासी विश्व' आणि 'आदिवासींच्या धर्मकल्पना व देवदेवता' अशी त्यांची मराठीत दोन स्वतंत्र पुस्तकं आहेत. 'नेटिव्ह अमेरिकन्स अ‍ॅन्ड नेटिव्ह इंडियन' हे त्यांचं इंग्रजी पुस्तक जगभर गाजत आहे. अमेरिकेतील एरिझोना राज्यातील आदिवासी व भारतातील आदिवासी यांचा तुलनात्मक अभ्यास या ग्रंथात डॉ. देवगावकर यांनी मांडला आहे. सूर्यभक्ती, देव पर्वतावर राहतो ही संकल्पना, मुलगी वयात आली असता करण्यात येणारा विधी यातील विलक्षण साम्य लक्षात आल्यावर हे सर्व आदिवासी आशियातून अमेरिकेत गेल्याचं त्यांनी मांडून दाखवलं.

संशोधनमूल्य असलेला अभ्यास, प्रत्यक्ष क्षेत्रीय भ्रमंती, भारतातील गेल्या शंभर वर्षातील ग्रंथसंचिताचा परामर्श आणि शासकीय अहवालांचं लेखन यामुळे डॉ. देवगावकर यांच्या लेखन व ग्रंथनिर्मितीला परिपूर्णता आली आहे. भटकण्यात कसूर नाही आणि लेखनात कुचराई नाही यामुळे त्यांचं लेखन काटेकोर होऊ शास्त्रकाट्याच्या कसोटीवर उतरलं आहे.

आदिवासींच्या अध्ययन संशोधनात समर्पित भावनेनं उभी हयात घालवलेले, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लेखनपुरुष त्यांना आयुष्यात भेटले. या थोर संशोधकांबरोबर विचारविमर्श व एकत्र चिंतन करण्याची त्यांना आयुष्यात लाभलेली संधी यामुळे त्यांच्या एकूण लेखन, चिंतन व मांडणी यांना जागतिक परिमाण लाभलं. त्यांच्या हाताखाली आचार्य पदवीप्राप्त अभ्यासकांच्या संख्येचं दशक पूर्ण झालं आहे. कॉन्स्टिटच्युशनल लॉ आणि अ‍ॅडमिनिस्ट्रेटिव्ह लॉ यात ते एलएलएम असल्यामुळे शासकीय अहवाल सिद्ध करताना समित्यांना त्यांचा कायदा सिद्ध होईल या बेतानं लिहिण्याची सवय उपयोगी व मार्गदर्शक ठरली. त्या समित्यांचे अध्यक्ष, सदस्य व सहलेखक यांनी त्यांचं हे ऋण वेळोवेळी मान्य केलं आहे.

आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभलेल्या या क्षेत्रातील तपस्वी महानुभवांच्या सहवासानं डॉ. देवगावकर यांचं व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ व संपन्न झालं आहे. फ्युरर हेमेनडॉर्फ व त्यांच्या पत्नी एलिझाबेथ, जर्मनीतील ऑक्सबर्ग विद्यापीठातील समाजशास्त्राचे प्रोफेसर वुल्फगँग क्नानोवेरी, (पुढे ते बाहेरियाचे गव्हर्नर झाले) टाटा मूलभूत विज्ञानसंस्थेच्या ट्रायबल कम्युनिटी ऑर्गनायझेशनचे प्रमुख डॉ. बेहराम एच. मेहता, अमेरिकेतील एरिझोना राज्य विद्यापीठातील मानवशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रा. जॉन डब्ल्यू. ओलसेन आणि भाषा वैज्ञानिक मानवशास्त्र प्रमुख प्रो. केन हिल व पत्नी जेल हिल यांचा सहवास त्यांना घडला. त्यांच्याशी झालेले सहअध्ययन-संशोधन डॉ. देवगावकर यांच्या आयुष्यातील सोनेरी क्षण आहेत.

विद्यापीठीय अभ्यास व संशोधन यांची एक चाकोरी आहेत. त्या चाकोरीत फिरणारे संशोधक आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रं व परिसंवाद यातील संशोधनपर लेखांचं वाचन करण्यात व नियतकालिकांतील प्रसिद्धीच्या वर्तुळात अडकून राहण्यात धन्यता मानतात. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात उतरून, जमिनीवर पाय घट्ट रोवून, चौफेर चिंतन करत, व्यापक भूमिका घेत ग्रंथरचना करणारे ग्रंथकार कमी असतात. डॉ. देवगावकर अशा अपवादात्मक ग्रंथकार-संशोधकांपैकी एक आहेत. त्यामुळे त्यांचं लेखन खणखणीत नाण्यासारखं सतत वाजत असतं. त्यांच्या कार्यात पत्नी डॉ. सौ. शैलजा देवगावकर यांचं सहकार्य नव्हे तर सहभाग आहे. ऋषिकुळातील देवगावकर दाम्पत्याची ज्ञानसाधना मानवशास्त्राचा जगभर सुरू असलेल्या अभ्यास-संशोधन यांना अधिक परिपूर्ण करण्यात गुंतली आहे. अभ्यासक-लेखक-संशोधक यांची प्रज्ञा प्रशासकीय क्षेत्र बाजूला ठेवून कार्यरत असते. डॉ. देवगावकर त्यालाही अपवाद आहेत, नव्या युगाची आव्हानं स्वीकारून नवे निष्कर्ष काढण्यात गुंतलेल्या ज्ञानर्षिसारखे. त्यामुळे त्यांचं कार्य मनोऱ्यातून मिरवणारं नसून लोकपथावर उभं राहून सामान्यजनांना मार्गदर्शन करणारं आहे.

**- प्राचार्य मदन धनकर**
विद्यानगर,
गजानन महाराज मंदिर मार्ग,
चंद्रपूर-४२२४०१

# अजिंठा : मानवी कलेचा आणि सप्तकुंडांचा निसर्गचमत्कार...

## प्रकाश पेठे

महाराष्ट्रातली लेणी हा दृश्य इतिहासातला चमत्कार आहे! भारतात बाराशे लेणी आहेत. त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्राबाहेर नाव घेण्याजोगी फक्त मध्यप्रदेशातली बाघ येथली लेणी. अजिंठ्याच्या लेण्यांना तर वैश्विक ठेव्यात स्थान मिळाले आहे. एका व्यक्तीने कलेचा परमोच्च बिंदू गाठला अशी उदाहरणे आहेत. पंडित भीमसेन जोशी मंद्रसप्तकातून तारसप्तकात जाणारी लखलखती दीर्घ तान घेत तेव्हा अंगावर शहारे येत. तसाच अनुभव उस्ताद अलिअकबरखां सरोदचा टणत्कार करत तेव्हा येई. एक व्यक्ती प्रतिभेने आणि परिश्रमाने लोकांना गुंगवून ठेवण्याचा चमत्कार करू शकते, त्याचेही आश्चर्य वाटते. लेखनात, चित्रकलेत आणि अन्य विषयांतही असे चमत्कार आहेत, पण अजिंठ्याची गोष्ट वेगळी आहे. झपाटलेल्या कुशल कलाकारांचा गट अजिंठ्याच्या घळीत डोंगर पोखरून त्यात चित्र-शिल्पकथा रंगवतो व ते काम पिढ्यान्‌पिढ्या चालू राहते तेव्हा मती गुंग होऊन जाते! त्यामुळे जो कोणी अजिंठ्याला भेट देतो तो चाट पडतो.

मद्रास कॅव्हिलरीच्या कॅप्टन जॉन स्मिथला अजिंठ्याची लेणी १८१९ साली सापडल्यापासून असंख्य लोकांनी ती पाहिली. ती अभ्यासण्यासाठी इतिहासकार जेम्स फर्ग्युसन, जे जे कॉलेजचे प्रिन्सिपाल बॅटली गुलाम यझदानी, बेंजामिन रोलँड हॅवेल, कुमारस्वामी, स्टेला क्रॅमरिश वगैरे अनेक जण येऊन गेले. अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठाचे प्राध्यापक वॉल्टर स्पिंक्सा गेली चाळीस वर्षे सातत्याने अजिंठ्याला अभ्यासासाठी येत आहेत. दरवर्षी जूनच्या दरम्यान ते विद्यार्थ्यांसाठी या गुहांमध्ये चर्चासत्र आयोजित करतात. वयाची ऐंशी वर्षे ओलांडलेल्या त्या वृद्ध तपस्व्याला पाहून मन आदराने भरून येते. त्यांनी 'हरिषेण ट्रस्ट' स्थापन केला आहे. हरिषेण ही पाचव्या



प्रकाश पेठे


शतकातील वाकाटकाच्या काळातील प्रतिष्ठित असामी. त्याच्या पाठिंब्यामुळे लेणी खोदली गेली. इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिकल रिसर्चचे मत आहे, की मुघलकाळच्या कागदपत्रांत अजिंठ्याचा उल्लेख सापडतो!

अजिंठ्याच्या डोंगररांगांतील पठारात गोलाकार खोलगट घळ तयार झाली आहे. घळीमधील दगडी भिंतींत एकोणतीस लेणी खोदली गेली आहेत. लेण्यांपर्यंत जाण्यासाठी जिथे बस घेऊन जाते तेथून चढून गेले असता एकाच दृष्टिक्षेपात सगळी लेणी दिसतात.

मी जेजे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर-मध्ये विद्यार्थी असताना, प्रथम (१९६१) अजिंठा पाहण्यास गेलो. एकटाच. औरंगाबादहून आम्ही प्रवासी बसने तेथे पोचलो. सगळेच प्रवासी लेणी पाहण्यास आले होते. दिवसभर लेण्यांमधे डोकावता डोकावता सूर्यास्त जवळ आला. प्रवासी परतीला लागले. माझे राहायचे कुठे हे काही नक्की होत नव्हते. तो प्रश्नच होता. सगळे लोक फर्दापूरला राहतात असे कळले. ते ठिकाण लेण्यांपासून सहा-सात किलोमीटर



अजिंठा लेण्यांचे दुरून दिसणारे मनोहर रूप



वॉल्टर स्पिंक्सा

दूर आहे. सूर्यास्तानंतर प्रवासी अजिंठा परिसरात राहत नसत. रात्र पडली तेव्हा चौकीदारसुद्धा आपापल्या घरी निघून गेले. गजबजलेली अजिंठ्याची दरी निर्मनुष्य झाली!

त्यावेळी लेण्यांजवळ टपरीवजा कँटिनशेजारी इमारत बांधली जात होती. स्लॅब घालून झालेली होती. इमारतीला भिंती नव्हत्या. तीन-चार मजूर एका कोपऱ्यापर्यंत झोपले होते. मी तेथेच एक रुंद फळी विटांवर ठेवून बाकडे तयार केले आणि पथारी पसरली. माझ्याकडे फारसे सामान नव्हते. एक पिशवी, तिच्यात लँडस्केप पॅड, वही, रंगांची पेटी, पेन, पेन्सिली, ब्रश, टॉवेल व एक चादर होती. मी पिशवी उशाला घेऊन डोळे मिटले. क्षणात झोप लागली, पण लवकर झोपल्याने पहाटेच जाग आली. हवा प्रसन्न होती. दरीत कोणी नव्हते. मी एकटा, पुढे खोल दरी, त्यामध्ये अंधुक पसरलेली लेणी आणि वर अथांग पसरलेले आकाश... सारखे माणसांच्यात असण्याच्या सवयीला ते वेगळे होते, पण भयाण वाटत नव्हते. अवघा निसर्ग माझ्या सोबतीला आहे असा भास होत होता. मी स्तंभित झालो होतो. जवळजवळ अर्धा-पाऊण तास त्याच अवस्थेत गेला. माझे भान हरपले होते. परंतु नंतर शुद्धीवर आलो ते शरीरक्रियांच्या जाणिवेमुळे. कल्याणमध्ये लहानपणापासून खाडीशी मैत्री असल्याने वाघोरा ओढ्यात मस्त विधी उरकले, मजेत आंघोळ केली.

घड्याळ नसल्याने किती वाजले ते कळायला मार्ग नव्हता. दरीत चक्कर मारली. प्रवासी येण्याच्या आतच लेण्यात गेलो. चित्रकलेच्या दोन परीक्षा दिल्या होत्या, तेवढीच माझी चित्रकलेशी ओळख. पण अजिंठा ही जागाच अशी आहे की कोणालाही चित्रकलेची थोडीशी जाण असेल तर त्याला स्फूर्ती यावी! मी त्या दिवसभर व नंतरही सात दिवस लेण्यांमध्ये बसून ती पाहत होतो आणि त्यांची स्केचेस करत होतो.

अजिंठ्यात राहण्याचा, दिवसरात्र वावरण्याचा अनुभव आता घेता येणे शक्य नाही. त्यावेळी मला काय हुक्की आली आणि मी तेथे गेलो! त्यातून माझ्याजवळ आयुष्यभराचे धन साठले. मी होतो तरुण मुलगा. मला कसलीच फिकीर नव्हती. माझे वडील रेल्वेत नोकरी करत. त्यांचा पास मिळे. मी तो घेऊन दर सुट्टीत भारतभर भटके, तसाच अजिंठ्यात येऊन पडलो होतो. योगायोगाने तेव्हा कार्तिक पौर्णिमा होती. त्यामुळे कोजागिरीला अजिंठ्यात राहिलेला मी एकटाच शहरवासी असणार! तेथे रात्री चंद्र उगवतो तेव्हा घळीतल्या एका पहाडावर प्रथम चंद्र-प्रकाश पडतो. त्यावेळी बाजूचा पहाड अंधारात असतो. चंद्र डोक्यावर आला की सगळी घळ चंद्रप्रकाशाने भरून जाते. रात्री घळीचे वातावरण गूढ भासते.

लेणीतर अद्वितीय आहेतच, शिवाय तिथला निसर्गचमत्कारही पाहण्यासारखा आहे. थोडे वाकड्या वाटेला वळले तर छोटा धबधबा दिसतो. लेण्याच्या समोरची पायवाट पायऱ्यांपर्यंत जवळ नेते. ती चढून गेल्यावर पठार लागते. वाघोरा नावाची छोटी नदी सात उड्या मारत अजिंठ्याच्या घळीत पडते. मानवनिर्मित अजिंठ्याच्या लेण्यांबरोबर निसर्गनिर्मित घळ आणि सात कुंडांतून उड्या मारत येणाऱ्या पाण्याचा खेळ विलक्षण आहे.

त्यावेळी अजिंठ्यात माझ्याच वयाचा कांबळे नावाचा गाइड होता. तो इतिहास घेऊन एम.ए. झाला होता. रात्री मी तिथेच झोपतो हे त्याला कळल्यावर तो म्हणाला, मी पण येतो झोपायला. माझेही जाणे-येणे वाचेल व गप्पा मारता येतील. कांबळेची साथ मिळाल्याने बरे वाटले. आम्ही रात्री दरीत फिरायला गेलो. चंद्र उगवायचा होता, त्यामुळे दरीत अंधार पसरला होता. जेमतेम पायाखालचे दिसत होते. सारे वातावरण गूढ होते. पण भीती वाटत नव्हती. मन काळाच्या पलीकडे गेले होते, निसर्गाची आणि माणसाची अजब कहाणी मनासमोर साकारत होती.

रात्री थंडी पडली. चादर एकच




सप्तकुंड, जुलै २००७

असल्याने तीच अर्धी अंगावर व अर्धी खाली घेऊन झोपलो. सकाळी हिंडत हिंडत व्ह्यू पॉईंटवर गेलो. तेथून डोळ्यांचे पारणे फिटावे असे दृश्य दिसते. वाघोरा नदी अजिंठ्याच्या दरीत सात वेगवेगळ्या धारांनी उतरत, धबधबा होऊन खाली पडते. ती पहिली उडी दगडाच्या कुंडात घेते. दगडाच्या तयार झालेल्या तोरणातून ती दुसऱ्या कुंडात पडते. तिसरी उडी सरळ न घेता घरंगळत येते. चौथ्या वेळी कापसासारखी पिंजत पिंजत येत उडी घेते. अशा अनेक उड्या घेत शेवटी ती दरीत झेप घेते. सप्तधारांचे पेन्सिल स्केच केले. व्ह्यू पॉईंटवरून सगळीच लेणी दिसतात. आपल्या पूर्वजांनी जगाला अचंबित करेल असे कलावैभव येथे कोरून-रंगवून ठेवले आहे याचा परतपरत प्रत्यय येत होता. अजिंठ्याने चित्रकला शिकवली. निसर्ग शिकवला. चंद्रप्रकाश किती सुंदर आणि वेगवेगळे रंग घेतो ते दिसले. नदीचा झुळझुळ आवाज ऐकला.

तीच नदी रात्री वेगळे रूप घेते. दरीत जणू रूपे ओतले जाते, पौर्णिमेला पडलेले टिपूर चांदणे खळखळत्या उथळ नदीच्या पाण्यात चमचमते. पाणीच चांदी होऊन जाते. मध्येच ढग येतो. चंद्र आड जातो. पण प्रकाश झिरपतोच. नदीत पाणी खोल नसल्याने सगळे पाणीच चमचमायला लागते. चांदण्याचे असंख्य तुकडे पाण्यात खेळत राहतात. हा खेळ पाहता पाहता केव्हा मध्यरात्र होई ते कळत नसे. एकीकडे नीरव शांतता. त्यात दरीत थंडीची लाट शिरते. झाडे गप्प उभी असतात. रातकिडेही झोपी जातात. आवाज येतो तो फक्त नदीच्या खळखळण्याचा. पुन्हा लवकर डोंगराचा एक भाग अंधारात जातो. एकीकडचा डोंगर शांत बसलेल्या गौतम बुद्धासारखा दिसतो आणि त्याच्या मागे डोंगररांगांच्या रूपात बोधिसत्त्वांची प्रभावळ पसरली आहे असा भास होतो.

सकाळी पुन्हा लवकर उठलो. नदीवर आंघोळ केली. झटपट आटोपून लेण्यांकडे गेलो. कांबळे एका बंगाली पार्टीला गाईड करत होता. मी पण त्यांच्यात सामील झालो. कांबळे प्रत्येक चित्र आणि त्याची गोष्ट रंगवून सांगत होता. त्यामुळे त्या बंगाली लोकां-बरोबर पुन्हा एक ते सव्वीस लेणी पाहिली. आपण विचार करायला लागतो तसतसे अजिंठा अधिकच अवघड व समजायला कठीण वाटू लागते. प्रत्येक लेण्याची कथा माहीत झाली. अजिंठ्याचे थोडेसे का होईना पण आकलन झाले, असे मनाला वाटले. काही जातककथा इतक्या सुंदर आहेत की तशा कोणाला सुचू शकणार नाहीत!



एका लेणीचे बाहेरून दिसणारे दृश्य

अजिंठ्यात सकाळ उजाडते ती एकदम नाही. डोंगराआडून सूर्य डोकावतो. दरीचे एक अंग पिवळ्या उन्हाने न्हाऊन निघते. दिवसभर कृत्रिम उजेडाची जरूर असलेल्या लेण्यांत प्रकाशझोत शिरतात. चैत्यगृहे तर त्यांच्या गोलाकार प्रचंड गवाक्षांतून येणाऱ्या प्रकाशाने उजळून निघतात. सूर्य निवांतपणे माणसांनी निर्माण केलेल्या कलाकृती पाहण्यासाठी गुंफे-गुंफेत शिरतो. सूर्याकडे तोंड असलेल्या गुंफा लखलखीत प्रकाशाने भरून जातात. सगळी गुंफा सूर्याने फेकलेल्या पिवळ्या सोन्याने भरून जाते. त्याच बेताला दरीत वारा वाहू लागतो आणि दुपार होते. संध्याकाळी पश्चिममुखी गुंफांमधे सूर्यप्रकाश तसाच शिरतो.

ज्यांनी ही चित्रे रंगवली त्या लोकांना पुरेसा उजेड किती वेळ मिळत असेल? एक गोष्ट लक्षात आली, की मी काढलेली रेखाचित्रे खिडकीतून पुरेसा उजेड येणाऱ्या भिंतींवरची आहेत. त्यामुळे पद्मपाणी, वज्रपाणी, बुद्धाची जी चित्रे अंधारात आहेत ती माझ्याकडून काढली गेली नाहीत. दुपारी जेवणाच्या वेळी अगदी तुरळक प्रवासी असत. तेव्हा मी एकटाच विहारात किंवा चैत्यगृहात जाई व चित्रे काढत बसलेला राही. अनाकलनीय भावना मनात दाटत. अजिंठ्याच्या वातावरणातच काहीतरी जादू आहे. नेमके काय आहे ते सांगता येत नाही.

कोजागिरी पौर्णिमेच्या मागचे-पुढचे दोन-दोन दिवस अजिंठ्याच्या स्वर्गमय परिसरात काढले. पौर्णिमेला रात्री डोंगराआडून चंद्र डोकावला आणि चंद्रप्रकाशाने दरी उजळत जाऊन काही वेळाने सर्वत्र चांदणेच चांदणे पसरले. सगळे स्पष्ट दिसत होते. बराच वेळ इकडेतिकडे फिरणे झाले. शेकडो वर्षांपूर्वी बौद्ध भिक्षू चांदण्या रात्री असेच मजेत फिरले असतील. त्यांनी छोट्या धबधब्याखाली आंघोळ केली असेल. विद्यार्थी विहारातल्या दगडांच्या गादीवर झोपून, पहाटे उठून, स्नान करून ते निसर्गाच्या सान्निध्यात मजेत अभ्यास करत असतील.

काही विहार व चैत्य मोठे आहेत. तेथे उजेड कमी आणि अंधार जास्त अशी स्थिती असते. त्यामुळे तेथेही एकटे असताना गूढ वाटते. त्या काळी तेथे वावरणारे बौद्ध भिक्षू डोळ्यांपुढे उभे राहतात. अशा प्रकारची मानसिक अवस्था दोघेतिघे बरोबर असताना होणार नाही. त्यासाठी तेथे एकटेच जायला



**अजिंठ्याच्या चित्रांमधील केशरचनेची प्रकाश पेठे यांनी काढलेली काही रेखाटने**

हवे. नर्मदेच्या खोऱ्यात अश्वत्थामा फिरत असतो असे म्हणतात, तसे भगवान बुद्ध अजिंठ्याच्या परिसरात विहरत असतील असे वाटले. वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाल्यावर बुद्धाने शिष्यांना, त्यांचे शिक्षण पूर्ण झाले असे सांगितले व त्यांना संदेश दिला, की 'चला, आता निघा. लोकांना अज्ञानातून मुक्त करा. दु:खी जनांचे अश्रू पुसा. वेगवेगळ्या दिशांना एकेकट्याने जा.'

माझे एकटे फिरणे उत्सुकतेपोटी होते. आपण कसला शोध घेत आहोत ते कळत नव्हते. पण ते कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात जमा होत राहिले असावे. महाविद्यालयीन शिक्षण होत असताना एकटाच फिरल्याने आयुष्यातील अनेक प्रश्नांची उत्तरे कळू लागली होती. आज उतारवयात मी ती अशी मांडतो, की एकट्या माणसाला फारसे काही कळत नाही, परंतु मानवतेचा वारसा पुढे जात असतो. त्यामधून असे अपूर्व वैभव साकार होते!

त्या काळात तिथे आलेल्यांनी जे निर्माण केले त्याची कल्पना केली तरी स्वत:च्या लहानगेपणाची जाणीव होते. थोडेसे का होईना पण स्वत:बद्दल वाटणारे कौतुक कापरासारखे उडून जाते. मागचे सगळे सोडून देऊन नवा विचार करायचा आटापिटा किती कठीण आहे ते उमगते. आपण य:कश्चित आहोत याची जाणीवच विलक्षण असते!

अजिंठ्यातल्या लेण्यांतल्या चित्रांत स्त्रियांच्या अनेक केशरचना दिसतात. त्या पाहिल्या की आपल्या आजच्या तरुणी काहीच नट्टापट्टा करत नाहीत किंवा अगदी वनातल्या सीतेसारख्या साध्या राहतात! मुली जीन्स आणि टॉप घालतात तो तर साधेपणाचा कळस होय. तरुणी इतक्या साधेपणाने का राहू लागल्या ते कळत नाही. चित्रांतल्या स्त्रियांचे डोळे आणि शरीरसौष्ठव आजच्या तरुणींपेक्षा उजवे आहे. त्यांतल्या काही स्त्रियांच्या पायांत मोजे दिसतात. दाऊद दळवी यांनी महाराष्ट्रातील लेणी या पुस्तकात सप्रमाण नमूद केले आहे, की भारतातील लेणी खोदली गेली त्या काळात इराणचे व भारताचे कलापातळीवर आदानप्रदान होते.

अजिंठ्याच्या त्या पहिल्या भेटीनंतर, बेचाळीस वर्षांनी मी पुन्हा तिथे गेलो. उत्सुकता तर होतीच. जुन्या नोंदी जवळ होत्या, मनात परिसर पाठ होता, त्यावेळचा अनुभव तर चिरस्मरणीय आहे. आता बदल घडला आहे. फर्दापूरच्या पुढे चहापाण्यासाठी संकुल उभे केले गेले आहे. अजिंठामार्गे जाणाऱ्या सगळ्या बसेस तिथे थांबतात. तेथून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या लेण्यांकडे जाण्यास सरकारने बसची सोय केली आहे. लेण्यांच्या पायथ्याशी बसगाड्यांसाठी ऐसपैस जागा आहे. वृक्षांच्या भोवती पार बांधून काढले आहेत. बसची वाट पाहणारे प्रवासी त्यावर बसतात. पायथ्यापासून लेणी उंचावर आहेत. तिथे जाण्यासाठी पायऱ्या बांधून काढल्या आहेत. वयस्कर लोकांसाठी रॅम्प बनवला आहे.

ज्या इमारतीच्या एकमजली सांगाड्यात मी सात दिवस राहिलो होतो तेथे महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाचे भोजनालय आहे. त्याच्या शेजारी स्वच्छ सुलभ स्नानगृह आहे. त्याच जागी किसनरावांचे एकुलते एक कँटीन होते. तिथे मी सात दिवस जेवलो होतो. त्यावेळी मैत्री झालेल्या किसनराव व कांबळे यांचा पत्ता लागला नाही. मात्र दशरथ अंभोरे हे त्यावेळचे पहारेकरी निवृत्त होऊन फर्दापूरमध्ये आपले उर्वरित आयुष्य घालवत आहेत असे कळले.

अजिंठ्यात माणूस गुंतत जातो. जातककथा सांगण्यासाठी केलेला चित्रकलेचा प्रयोग अद्भुत आहे. ती चित्रे आहेत त्या स्थितीत कशी ठेवायची हा मोठा प्रश्न आपल्या देशापुढे आहे. एकदा का अजिंठ्यात जीव गुंतला की त्याचा मनगमता गुंता होतो आणि त्यातून बाहेर पडावेसे वाटत नाही.

('थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या वेबपोर्टवरून साभार)

**– प्रकाश पेठे**

भ्रमणध्वनी : ०९४२७७ ८६८२३

दूरध्वनी: (०२६५) २६४ १५७३

prakashpethe@gmail.com

# एकाच आदिमायेची लेकरं

डॉ. उज्ज्वला दळवी

आईच्या सांगण्यावरून कार्तिकेयानं पृथ्वीप्रदक्षिणा केली. देवपुत्रच तो. पळतपळत पृथ्वीभोवती चक्कर मारून पुन्हा आईकडे खाऊ मागायला हजर झाला! माणसाला ते कुठून जमणार? पण समग्र भूगोलाची यात्रा करायची ओढ मानवाच्या जनुकांतच लिहिलेली असावी. सोळाव्या शतकापासून अनेक धाडसी युरोपीय खलाश्यांनी पृथ्वीप्रदक्षिणेच्या प्रयत्नांत उभं आयुष्य आणि कित्येकदा प्राणही वेचले. प्रवासाच्या साधनांची प्रगती होत राहिली. पहिल्या अंतराळवीरानं दीड तासात पृथ्वीभोवती फेरी मारली. त्यालाही प्रचंड साहसाची गरज होतीच. पण आता तर नेहमीच्या वेगवान विमानांतून जगाचा फेरफटका आरामात करणं ही केवळ चैनीची बाब झालेली आहे. तो तीन दिवसांत उरकायचा की रमतगमत महिनोन् महिने चालवायचा हे ज्याच्या-त्याच्या खिशातली चवड आणि कामातली सवड ठरवते.

मानवजातीची पहिली पृथ्वीयात्रा इतकी सोपी नव्हती. समस्त मानवजातीच्या आदिमायेच्या लेकरांनी तो खडतर प्रवास हजारो वर्षांपूर्वी सुरू केला आणि हजारो वर्षं चालू ठेवला. आधुनिक तंत्रज्ञानाची दुर्बीण भूतकाळातल्या त्या काफल्याच्या वाटेवर रोखून अनेक प्रकारचे संशोधक त्या प्रवासाचं एकसंध विज्ञानचित्र काढताहेत. त्या अफाट चित्रात रोज नवे बारकावे भरले जाताहेत. काही तपशील पुसून नव्यानं चितारले जाताहेत. पण जे आजवर तयार झालं आहे तेही अद्‌भुताशी स्पर्धा करणारं आहे.

‘जगभरात ठिकठिकाणी सापडलेल्या पुरातन मानवांच्या हाडांत आणि दातांत सापडलेले DNA चे कण शास्त्रज्ञांनी तपासले. शिवाय वेगवेगळ्या देशांतल्या, भिन्न भाषा बोलणाऱ्या समाजांतून जनुकसंचयाचे नमुने संशोधकांनी गोळा केले. आणि त्यांच्यातल्या जनुक-लेखांचा बारकाईने तुलनात्मक अभ्यास केला. अशा जमवलेल्या कोशात त्यांना मानववंशाची जनुक-रोजनिशी सापडली. माणसाने जगाचा कानाकोपरा कसा पादाक्रांत केला ती सुफळ संपूर्ण कहाणी त्या जनुक-डायरीतून व्यवस्थित वाचता आली.’

शिकंदर दिग्विजयासाठी मॅसेडोनिया-हून निघाला फक्त अडीच हजार वर्षांपूर्वी. आदिमानव जग पादाक्रान्त करायला निघाला तो पंच्याऐंशी हजार वर्षांपूर्वी! तो शिकंदरासारखा जग जिंकायला निघाला नव्हता. हातावर पोट असलेला आपला तो पूर्वज केवळ ‘आबोदाना आणि आशियाना’ धुंडायला निघाला होता. साधी शिदोरी बांधून घ्यायचीही ऐपत नव्हती त्याला.

जगातला पहिला माणूस होता का तो? नाही. सुमारे पंचवीस लाख वर्षांपूर्वी पहिला मानवसदृश प्राणी (Homo erecuts) आफ्रिकेत वावरला. तो चिंपांझीसारखा दिसत असला तरी खरोखरच ताठ चालणारा होता. त्या काळातली परिस्थिती खडतर होती. तिच्याशी टक्कर देऊन जगायला अक्कलहुशारीची गरज होती. तसे झगडून तगणारे मानवसदृश अधिकाधिक बुद्धिमान होत गेले. त्यांची शस्त्रं अधिक धारदार आणि प्रभावी बनली. रोजचं जिणं सुकर करायला त्यांनी बाळबोध का होईना पण तऱ्हतऱ्हेची साधनं वापरली. निॲण्डर्थल माणूस तर प्राण्यांची कातडी साफ करून वापरत होता. बहुतेक शेकोटीही पेटवत होता. त्याच्या कळपातल्या एखाद्याचं हाड मोडलं तर बाकीचे त्याची काळजी घेत. एखाद्याचा मृत्यू झाला तर कळप त्याचं दफन करी. या विविध मानवसदृशांपैकी कित्येक जमातींतल्या टोळ्या आफ्रिका खंड सोडून मध्यपूर्वेत, भारतात, अतिपूर्वेत पोचल्या, वसल्या, विस्तारल्या. पण नंतरच्या काळात त्यांचे फक्त अवशेष मागे उरले.

जे मानवसदृश आफ्रिकेत मागे राहिले त्यांना निसर्ग आव्हानं देतच राहिला. त्या आव्हानांना तोंड देता देता त्यांच्यात अनेक बदल झाले. त्याप्रमाणे त्यांच्या जनुकसंचयात अधिक वैविध्य येत राहिलं. हजारो वर्षं उत्क्रांती

चालूच राहिली. त्यातच एक लाख सत्तर हजार वर्षांपूर्वी फार कडाक्याचं, महा-हिमयुग आलं. त्यातून मोठ्या चिकाटीनं आणि हिकमतीनं जगलेल्या मानवपूर्वजांची संख्या जेमतेम दहा हजार उरली. तोवर शिकार करत, पाला-फळं-कंदमुळं ओरबाडून त्यावर गुजराण करत भटकणाऱ्या त्या जमाती समुद्रकिनाऱ्यावर पोचल्या. तिथले शिंपले आणि मासे खायला लागल्या. तिथले शिंपले खाऊन त्यांच्या कवचांचे ढिगारे (shell middens) त्यांनी मागे सोडले. किरणोत्सारी कालमापनानं पडताळलेले त्या काळातले असे ढिगारे शास्त्रज्ञांना सापडले आहेत. जीवन-मरणाच्या घोर कसोटीतून निभावताना त्या लोकांत बरेच नवे जनुकपालट झाले.

अशा उत्क्रांतीतून दीड लाख वर्षांपूर्वी साऱ्या मानवांची आदिमाय जन्माला आली. ती निॲण्डर्थल माणसाहून वेगळ्या वंशाची (species) कितीतरी अधिक बुद्धिमान आणि प्रगत होती. तिचे नातेवाईक लहान कळपात न राहता मोठ्या समाजात राहत होते. रीतिरिवाज पाळत होते. ते शिकार भाजून खात होते. मासे पकडायला हाडकाचा गळ आणि कातडी शिवायला निमुळत्या दगडाचा किंवा हाडकाचा दाभण वापरत होते. या शस्त्रांखेरीज त्यांच्याकडे मोजक्या शब्दांचं आणि तुटपुंज्या व्याकरणाचं का होईना पण भाषेचं अस्त्र असावं अशीही अटकळ आहे. त्या अस्त्रामुळे प्रत्येक माणसाचा अनुभव सामाजिक शहाणपणाच्या पुंजीत जमा होणं, पुढच्या पिढीला दिला जाणं हेही जमलं असावं.

सव्वा लाख वर्षांपूर्वी, दोन हिमयुगां-मधल्या काळात, या समाजातल्या काही-शे किंवा काही हजार साहसी माणसांची एक तुकडी आफ्रिका सोडून नव्या मोहिमेवर निघाली. त्यावेळी सुवेझ कालवा नव्हता. तो दोन खंडांना जोडणारा नैसर्गिक सुवेझ-पूल होता. त्यावरून ते लोक अरेबियाच्या उत्तरेच्या भूमध्य-सागरी किनाऱ्यावर (Levant = सीरिया, जॉर्डन, लेबॅनॉन, इ.) पोचले. दर एक लाख वर्षांनी काही हजार वर्षांपुरताच हा भाग हिरवागार बनतो. हा काही हजार वर्षांचा हरितकाल संपताच तिथे पुन्हा वाळवंट पसरतं. त्या वाळवंटात आणि पुढल्या हिमयुगात त्या पहिल्या साहसी माणसांचा टिकाव लागला नाही. पुढच्या हरितयुगात तिथे निॲण्डर्थल फोफावले. ते मात्र तीस ते चाळीस हजार वर्षांपूर्वीपर्यंत तिथे राहिले.

सुमारे पंच्याऐंशी-हजार वर्षांपूर्वी नवं हिमयुग सुरू झालं. हिमयुगात दोन्ही ध्रुवांवरची बर्फाची टोपी चांगलीच रुंदावते. त्या अधिकच्या हिम-रुंदीसाठी समुद्रांचं पाणी उसनं घ्यावं लागतं. मग समुद्रांचे उथळ भाग कोरडे पडतात. अधलीमधली बेटं उघडी पडतात. नवी खंडं, नव्या वाटा निर्माण होतात.

पंच्याऐंशी हजार वर्षांपूर्वीच्या त्या हिमयुगात समुद्राची पातळी कित्येक मीटर खालावली. रक्तसमुद्राच्या किनारपट्टीचे शिंपले आणि मासे कमी झाले. त्यामुळे तिथे वसलेल्या आदिमायेच्या लेकरांची दुसरी तुकडी कशासाठी, पोटासाठी नवे किनारे शोधत प्रवासाला निघाली. या तुकडीनं नवा, दक्षिणेचा मार्ग घेतला. सध्याच्या जिबूतीकडून येमेनला जाण्याचा हा 'बाबल मन्दीब' किंवा 'दुःखाचं द्वार' नावाचा सागरी रस्ता. समुद्रपातळी कमी झाल्यामुळे या वाटेवरली पोवळ्याची बेटं उघडी पडली होती. त्यांच्या आधारानं ही माणसं एडनच्या मोकळ्या किनाऱ्यावर पोचली.

किनाऱ्याच्या एका भागातल्या खाऊचा चट्टामट्टा झाला की ही तुकडी पुढे सरकून लगतच्या नव्या किनाऱ्यावर जाई. असा किनाऱ्याला धरून सरकता प्रवास पुढली दहा हजार वर्षं चालला. त्या काळातल्या खालावलेल्या समुद्रसपाटीमुळे ओहोटीच्या वेळी चालत चालत त्यांना अधलेमधले पैलतीर गाठता आले. ओमान-अरेबिया-कुवैत-इराण-पाकिस्तान-भारत-ब्रह्मदेश असं करत ही किनारी-पदयात्रा सुमात्रा आणि जावा बेटांशी जाऊन ठेपली.

पासष्ट हजार वर्षांपूर्वी इंडोनेशिया-लगतचा टिमोर भाग आणि ऑस्ट्रेलिया यांच्या मधल्या टिमोर समुद्राची पातळी चांगलीच खाली गेली होती. त्यामुळे टिमोरहून ऑस्ट्रेलियात पोचायला फक्त १६० किलोमीटर अंतर समुद्रातून कापावं लागलं असतं. तिथून पुढली पाच हजार वर्षं समुद्रपातळी तशी खालीच राहिली आणि मग झपाट्यानं वाढत गेली.

त्यामुळे नेमक्या त्याच पाच हजार वर्षांत तो समुद्र छोट्या नावांतून पार करून किंवा समुद्री प्रवाहांबरोबर तरंगत साध्या तराफ्यांवरून ही मानवी सफर ऑस्ट्रेलियाला पोचली असावी. जनुकांमधल्या परमाणूंच्या घड्याळाप्रमाणे हे वेळापत्रक चोख आहे. आणि ऑस्ट्रेलियात सापडलेले फॉसिल्स, त्यांचं किरणोत्सारी कालमापन हे देखील या तारखांना पुष्टी देतात.

हा समुद्र माणसांनी ओलांडला. पौराणिक कथेत मनूच्या नौकेतून साऱ्या प्राणिजातींचे प्रतिनिधी तरून गेले. पण पुरातन गाथेत मात्र मानवाच्या तराफ्यावरून इतर प्राणीमात्रांना टिमोरजवळची लक्ष्मणरेषा (Wallace line) ओलांडता आली नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियातले प्राणी, पक्षी, वृक्षवल्ली यांच्या जाती वेगळ्याच राहिल्या.

चौऱ्याहत्तर हजार वर्षांपूर्वी सुमात्रा-मधल्या टोबा ज्वालामुखीचा महाभयंकर उद्रेक झाला. त्याचा रोख वायव्येला होता. त्यामुळे सगळ्या भारतीय उपखंडावर पंधरा फूट जाडीचा राखेचा थर बसला. तिथल्या बहुतेक साऱ्या रहिवाशांचा निर्वंश झाला. भारताच्या पश्चिम किनारपट्टीला त्या मानानं कमी झळ पोचली. तिथली जुनी माणसं (द्रविड) आणि मलायाच्या जंगलात राहणारी सेनोई जमात यांची नव्यानं आवक होऊन त्या संकरानं भारतातली बहुसंख्य प्रजा जन्मली. आदिमायेच्या या नव्या कन्याशाखांचा जनुक-तोंडवळा अतिपूर्वेच्या जमातींहून बराच वेगळा झाला आहे.

शिवाय, पुढील काळातही उत्तरेकडून नवी आवक चालूच राहिली. सध्याच्या भारतीय जनुकजमाती मध्य आशियाच्या

जनुकजमातींहून भिन्न आहेत. जनुक-लोंढे वेगवेगळ्या दिशांहून जसजसे आले आणि त्यांच्या संकरानं जी जी मिश्रणं झाली त्याप्रमाणे जनुकीय वर्गवारी झालेली आहे. काही जनुकीय ठसे (M25) भारतभर सापडत असले तरी प्रामुख्यानं पश्चिमेला दिसतात. हे भारताबाहेरच्या जगात क्वचितच आढळतात. R5 हा पश्चिमेलाच अधिक आहे. M2 हा जनुकवर्ग मुख्यत्वे पूर्वेला दिसतो. M4चं उत्तरेला प्राधिक्य आहे. M3 ईशान्येला दुर्मिळ आहेत पण बाकी भारतात सर्वत्र आढळतात. M18 संपूर्ण उपखंडात पसरले आहेत. पण मध्य भारतात त्यांची दाटी सर्वाधिक आहे.

पंच्याऐंशी हजार वर्षांपूर्वी आफ्रिकेतून बाहेर पडलेले सगळेच लोक किनाऱ्याच्या यात्रेसाठी पुढे पुढे गेले नाहीत. काही थोडी माणसं प्रत्येक मुक्कामाला ठाण मांडून मागे राहिली. असेच काहीजण अरेबियात मुक्कामाला राहिले. त्यांच्या उत्तरेला वाळवंट होतं. पन्नास हजार वर्षांपूर्वी तिथल्या वातावरणात ओलावा आला, वाळवंटात हिरवळ पसरली आणि अरेबियातल्या या समाजातल्या काही चौकस माणसांना उत्तरेच्या सुपीक वळणावर (fertile crescent = सीरिया,जॉर्डन, लेबॅनॉन, इस्राएल, मेसोपोटेमिया) पोचता आलं. हे सुपीक वळणही तेव्हाच सुजल-सुफल झालं होतं. त्या वळणावरून पुढे जात जात हा गट तुर्कस्तानमार्गे युरोपात पोचला. या गटातल्या माणसांची एक तुकडी वाटेत वेगळी फुटून भारतात गेली आणि सिंधू नदीच्या काठाकाठानं तिच्या उगमापर्यंत पोचली. इथून वर मध्य आशियातले देश पार करून युरोपात पोचेतो आणखी दहा हजार वर्षं निघून गेली होती. त्यापूर्वीच निॲण्डर्थल तिथे पोचून जुनेपुराणे झाले होते.

त्या पुढच्या हिमयुगात युरोपातला मानववंश गुहा-कपारींच्या निवाऱ्याला दडी मारून बसला. प्रत्येक निवाऱ्याचा गट वेगळा उत्क्रांत झाला. जवळजवळ पंचवीस ते बावीस हजार वर्षांपूर्वी हे गट बाहेर पडले. समुद्रसपाटी अजून वर आली नव्हती. त्यामुळे रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये, अलास्काजवळ बेरिंजियाचा भूखंड होता, त्यावर हिरवळ होती, तिथे हे भिन्न गट राहायला आले आणि तिथून वेगवेगळे गट म्हणूनच उत्तर अमेरिकेत शिरले. काही जण बेरिंजियातच रेंगाळले आणि काही हजार वर्षांनंतर अमेरिकेत आले. त्यामुळे अमेरिकेत त्या वेगवेगळ्या जनुक-गटांचे वंशज एकत्र आले. त्यानंतर, सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी, वातावरणाचं तापमान वाढलं, समुद्रपातळी उंचावली आणि बेरिंजिया खंड पाण्याखाली जाऊन तिथे बेरिंगची समुद्रधुनी झाली. तिथली पायवाट लोपली.

राजकन्येनं चालताना पथावर मोती सांडत जावं तशा या आदिमायेच्या कन्याशाखा हा सगळा प्रवास चालू असताना वाटेवर आपल्या खाणाखुणा ठेवत गेल्या. चित्रं, लेणी, चपट्या दगडांची शस्त्रं, सांगाडे असं सारं त्यांनी कित्येक मैल आणि हजारो वर्षं मागे सोडलं. त्या साऱ्याचा शास्त्रोक्त वापर करून संशोधकांना त्या आदिकन्यांचा माग काढता आला. जशा आदिमातेच्या आदिकन्या होत्या तसेच मूळपुरुषाचे आदिपुत्र आणि आदि-नातूही होते. तेही जवळजवळ याच मार्गानं अमेरिकेपर्यंत पोचल्याचे अनेक पुरावे मिळाले आहेत.

मानववंशाच्या पुरातन इतिहासाचा वेध घेणं सोपं नसतं. पुरातत्त्वशास्त्रज्ञ मोक्याच्या जागा हेरून तिथे उत्खनन करतात. त्यामध्ये पुरातन काळातल्या प्राण्यांचे सांगाडे आणि पाषाणरूप अवशेष (fossils) मिळतात. चपट्या दगडांना धार काढून बनवलेली आदिमानवांची शस्त्रं सापडतात. काही गुहांमध्ये कोरीव लेणी किंवा भित्तिचित्रं आढळतात. यांचं नेमकं वय शोधून काढायला अनेक क्लृप्त्या योजाव्या लागतात.

इतिहासातल्या घटनांचा काळ ठरवायला जुन्या झाडांच्या बुंध्यांतले वाढीचे थर मोजणं, प्राण्यांच्या अवशेषांतल्या किरणोत्सारी कार्बनचं किंवा पोटॅशियम-आर्‌गॉनचं वय ठरवणं वगैरे पध्दती सोयीच्या असतात. पण आदिमानवाच्या लेण्यांचं वय ठरवायला दगडांमधल्या स्फटिकांतला किरणोत्सारी इतिहास वाचणाऱ्या नव्या पध्दती (thermoluminescence, optical dating) शोधाव्या लागल्या. तरीही आदिमायेच्या कन्यांच्या पुराण्या सांगाड्यांनी आपली वयं लपवलीच. बायकाच त्या!

या अज्ञातात दडलेल्या पुरातनाचं कवाड उघडलं ते जनुकशास्त्रातल्या शोधांनी.

साऱ्या जीवसृष्टीचं मूलभूत सूत्र म्हणजे DNA. स्वतः निर्जीव असलेलं हे जीवसूत्र हा आदिपेशीपासून आजतागायत अव्याहत चालत आलेला जैविक वारसा आहे. साधारण चार हजार कोटी वर्षांपूर्वी जीवनाची उत्पत्ती झाली. तेव्हापासूनची रोजनिशी या DNAच्या रूपात आपल्या प्रत्येक पेशीत नोंदलेली आहे. सुमारे सात कोटी वर्षांपूर्वी लुप्त झालेल्या डिनोसॉरची जी हाडं उत्खननात सापडली त्यांतल्या DNAचा थोडा अंश अजूनही शाबूत मिळाला. जगभरात ठिकठिकाणी सापडलेल्या पुरातन मानवांच्या हाडांत आणि दातांत देखील असे DNAचे कण सापडले.

थोडक्या वेळात DNAच्या एकेका थेंबाचं जनुक-तळं करू शकणारं तंत्र (PCR) संशोधकांकडे होतंच. त्यांनी अशा साऱ्या DNAचा झटून अभ्यास केला. त्यांनी वेगवेगळ्या वंशांच्या मानव-सदृशांचे जनुककोश आणि ठिकठिकाणच्या उत्खननात मिळालेल्या अस्थी-दंतांतले DNA संचय पडताळून पाहायचे ठरवले. शिवाय वेगवेगळ्या देशांतल्या सध्याच्या विविध मानव-वर्णांचेही जनुकसंचय तपासले.

जुन्या-नव्या अनेक जनुकसंचयांतला भिन्नपणा आणि सारखेपणाही आजमावायचा असला तर त्यासाठी दर पिढीत घुसळला जाणारा साधारण जनुकविभाग कामाचा नव्हता. शास्त्रज्ञांनी जनुकसंचयाचे न बदलता कायम राहणारे भाग शोधले.

Y-रंगसूत्राचा बराचसा भाग पिढ्या-पिढ्यांच्या घुसळणीत भाग घेत नाही. त्यामुळे

त्यातल्या जनुकांची देवाणघेवाण किंवा काटछाट होत नाही. अशा या शाश्वत भागात फक्त वडिलांकडून मुलग्यांना मिळणारी जवळजवळ सहा कोटी जनुकाक्षरं असतात. त्यांचा अभ्यास केला तर वडील, आजोबा, पणजोबा, खापरपणजोबा अशी पितृवांशिकतेची मुळं शोधत जाता येतं.

मायटोकॉन्ड्रिया म्हणजे पेशींची ऊर्जाकेंद्रं. या मायटोकॉण्ड्रियांपाशी त्यांची सोळा हजार स्वायत्त जनुकाक्षरं असतात. ती पेशीकेंद्राच्या बाहेर असतात आणि घुसळणीत भाग न घेतल्यामुळे शाश्वत असतात. ही जनुकं (काही अगदी मोजके अपवाद वगळता) फक्त आईकडून मुलींना मिळतात. या मातृजनुकांचा मागोवा घेत आई, आजी, पणजी, असा मातृवंश उलगडता येतो.

या दोन्ही प्रकारच्या शाश्वत जनुकांत काटछाट होत नसल्यामुळे त्यांच्यात अधूनमधून होणारे बरेवाईट जनुकपालट (mutations) तिथेच साचत जातात. त्या साचणाऱ्या पालटांवरून शास्त्रज्ञांनी 'काळ-काम-वेगा'ची गणितं (molecular clock) मांडली आणि एकेका प्राणिजातीचं (species) आणि त्यातच मानवजातीचंही तिच्या उत्पत्तीपासूनचं वय शोधलं.

पाषाणातले अवशेष, आदिमानवाची हत्यारं, भित्तिचित्रं, किरणोत्सारी कालमापन आणि पृथ्वीवरच्या वातावरणातल्या बदलांचे आडाखे या साऱ्यांचा ताळा या संशोधनाच्या निष्कर्षांशी व्यवस्थित जुळला.

या मागोव्यामुळे समस्त मानवजातीला तिची आदिमाय दीड लाख वर्षांपूर्वीच्या आफ्रिकेतल्या रिफ्ट खोऱ्यात गवसली.

याचा अर्थ, ती एकच बाई होती असा नव्हे. पण त्या एकाच वंशातल्या, एकमेकींच्या सख्ख्या किंवा मावस-बहिणी नक्की होत्या. त्या काळात आफ्रिकेच्या त्या भागात आदिमानवांच्या इतरही जमाती होत्या. आदिमायेच्या त्या दूरच्या भावंडांचेही सांगाडे मिळालेले आहेत. त्यांच्याही जनुकसंचयांचा सखोल अभ्यास झाला आहे. आदिमायेचा आणि त्यांचा जनुकसंचय ९९.५% सारखाच होता. पण त्या वरच्या अर्ध्या टक्क्याच्या फरकानं आदिमायेचं वेगळेपण ठरलं. कुरमुऱ्याचाच चिवडा, पण एका नमुन्यात डाळं-शेंगदाणे-लाल तिखट होतं तर दुसऱ्यात काजू-बेदाणे-हिरवी मिरची होती. मग संपूर्ण जगभरातल्या देशोदेशींच्या आधुनिक माणसांचे जनुक-नमुने गोळा करून त्यांचाही रीतसर तपास केला गेला. त्या साऱ्यांच्या जनुककोशांत ते अर्ध्या टक्क्याचं वेगळेपण एकसारखं आणि अगदी आदिमायेसारखंच निघालं. Y-रंगसूत्राच्या अभ्यासानं धुंडलेलं पितृवंशाचं मूळदेखील तसंच, आफ्रिकेतच मिळालं.

अशा रीतीनं मानव्याचं आजोळ आफ्रिकेत सापडलं. मग आदि-मानवी प्रवासाचा मार्ग कसा ठरवला?

मानववंशाची पाळंमुळं शोधायला मातृ-पितृ जनुकांचा आधार मिळाला आणि या वृक्षाच्या फांद्या-डहाळ्या-धुमारे तपासत जाताना मात्र जनुककोशातल्या ओळखीच्या जनुकांच्या अधेमधे पसरलेले DNAचे भाग महत्त्वाचे ठरले. त्यांच्यातली जनुकाक्षरांच्या गटांची पुनरावृत्ती (STRs किंवा तोकड्या-तोतऱ्या साखळ्या) आणि काही ठिकाणचा एकाक्षरी वेगळेपणा (SNPs किंवा स्निप्स. यांच्याबद्दल आपण 'जनुकठशाच्या मागोव्या'त बोललो आहोत.) ह्यांची रांगोळी म्हणजेच Genetic fingerprints किंवा जनुकठसे. ही रांगोळी प्रत्येक व्यक्तीची एकमेवाद्वितीय असतेच, शिवाय तिचे रंग, तिची ठिपक्या-ओळींची रचनाही प्राणीवंशाच्या एकेका शाखेची ठरावीक असते. एकत्र स्थलांतर करणाऱ्या संपूर्ण जथ्यात या जनुक-रांगोळीच्या पध्दतीत लक्षणीय सारखेपणा असतो.

जगभरातून वेगवेगळ्या देशांतल्या, भिन्न भाषा बोलणाऱ्या समाजांतून जनुकसंचयाचे नमुने संशोधकांनी गोळा केले. त्यांच्यातल्या या जनुक-रांगोळीचा बारकाईनं तुलनात्मक अभ्यास केला. माणसानं जगाचा कोनाकोपरा कसा पादाक्रांत केला ती सुफळ संपूर्ण कहाणी मानवजातीच्या जनुक-डायरीतून व्यवस्थित वाचता आली.

अशा जनुकीय अभ्यासाचा वापर इतरही ठिकाणी झाला. जनुकांतल्या खूणगाठी पक्क्या असतात. सत्तावीसशे वर्षांपूर्वी यहुदी लोकांच्या दहा जमाती इस्राएलमधून हकलल्या गेल्या. त्यांचा मागमूसही राहिला नाही. अलीकडे दक्षिण आफ्रिकेतली एक काळी, बांटू जमात समाजशास्त्रज्ञांच्या नजरेत भरली. ही जमात सनातन यहुदी धर्माच्या चालीरीती कर्मठपणे पाळत होती. त्यांची भाषा जवळपासच्या बांटूसारखीच असली तरी त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार नव्हता. त्यांच्यातलं प्रत्येक कुटुंब घरातल्या लहानग्यांना इस्राएलमधल्या आपल्या पूर्वजांबद्दलच्या दंतकथा सांगत असे. शास्त्रज्ञांनी त्यांची जनुकतपासणी केली. या बांटूंच्या, विशेषत्वानं त्यांच्यातल्या बूबा या उच्च वर्गाच्या जनुकसंचयात इस्राएलमधल्या कोहेन या गोऱ्या, कर्मठ धर्माधिकारी ज्यूंच्या जनुककोशाशी जुळणारे जनुकठसे सापडले! भोवतालच्या बांटूंच्या किंवा जवळच्या अरबांच्यात तसे जनुकठसे नव्हते. जनुकभाषेतल्या अमरकथांनी लेम्बांच्या दंतकथांना इतिहासाचा दर्जा दिला. अशा इतर 'जनुकायन'संबंधांनी DNA रांगोळीतून मिळणाऱ्या पुरातन संदेशांना पुष्टी मिळाली.

शिवाय फॉसिल्सच्या, दगडी शस्त्रांच्या, प्राचीन शिल्पांच्या आणि चित्रांच्या दगडांमधल्या स्फटिकांचं किरणोत्सारी कालमापन, कार्बन डेटिंग, दगडी शस्त्रांमधली प्रगती, अशा इतर पद्धतींनीही जनुकरांगोळीनं दाखवलेला प्रवासाचा मार्ग बरोबर असल्याची ग्वाही दिली.

टोबा ज्वालामुखीची तारीख निर्विवाद सिध्द झालेली होती. तिच्या अनुषंगानंही बरेच पुरावे पक्के झाले.

गेल्या हजारो वर्षांत पृथ्वीच्या वातावरणात अनेक वेळा बदल झाले. हिमयुगं आली आणि गेली. आपली पृथ्वी सूर्याभोवती ज्या मार्गानं फिरते तो मार्ग कधी वर्तुळाकार तर कधी लंबवर्तुळाकार असतो. तशा आकार बदलणाऱ्या मार्गावर फिरताना ती स्वतः

भोवऱ्यासारखी माना डोलावत असते. त्यामुळे तिच्यापर्यंत पोचणारी सूर्याची उष्णता सतत कमीजास्त होत असते. त्यानुसार हिमयुगं येत-जात राहतात. संशोधकांनी त्या पुरातन बदलांचा आणि त्यानुसार पालटत गेलेल्या भूगोलाचा अभ्यास केला. मनुष्यजातीच्या आदि-प्रवासाची वाट जाणून घ्यायला त्या 'ऐतिहासिक भूगोला'चाही मोठा उपयोग झाला.

नुसत्या मानवी जनुकांचा अभ्यास करून संशोधक थांबले नाहीत. मानववंशाशी निगडित असलेल्या प्राण्यांच्या, जिवाणूंच्या आणि विषाणूंच्या जनुकांमधली माहितीदेखील या 'प्रवासवर्णना'चा भाग झाली.

मानवी उवांनी वानरी उवांपासून सुमारे छप्पन्न लाख वर्षांपूर्वी जनुकीय फारकत घेतली. सुमारे अठरा लाख वर्षांपूर्वी मानव-सदृशांची (Homo erectus) एक टोळी आफ्रिकेतून निघून मध्य आशियात पोचली. तिनं आपल्या डोक्यातून उवा आणल्या होत्या. त्या उवांची उत्क्रांती होत गेली. त्या आफ्रिकन उवांहून वेगळ्या झाल्या. पन्नास हजार वर्षांपूर्वी जेव्हा आदिमायेची लेकरं (Homo sapiens) मध्य आशियात जाऊन थडकली तेव्हा त्यांच्या डोक्यात मूळच्या आफ्रिकन उवा होत्या. जेव्हा आदिमायेच्या नाती अमेरिकेत पोचल्या तेव्हा त्यांच्या डोक्यात या दोन्ही प्रकारच्या उवा होत्या. ज्याअर्थी उवांची देवाणघेवाण झाली त्याअर्थी या दोन जमातींची जवळीक झाली असावी. पण या दोन मानवजमातीही तोवर जनुकदृष्ट्या इतक्या भिन्न झाल्या होत्या की त्यांच्यात बेटीव्यवहार होणं कठीण होतं.

उवांच्या जनुकांनी आणखीही काही सांगितलं. डोक्यातल्या उवांची जनुकीय जात अंगावरच्या उवांहून वेगळी असते. अंगावरच्या उवा वस्त्रांमध्ये राहतात. ही अंगावरच्या उवांची जनुकजमात एक लाख सत्तर हजार वर्षांपूर्वी निर्माण झाली. त्याअर्थी त्या कडाक्याच्या हिमयुगात माणसानं अंग झाकायला सुरुवात केली असावी. अंगावर कातड्याची वस्त्रं चढल्यावरच आफ्रिकेतून सीमोल्लंघन जमलं.

ठिकठिकाणच्या उत्खननात पुरातन मांजरांचेही अवशेष मिळाले. त्यांच्याही जनुककोशांचा अभ्यास झाला. त्यांच्या आदिमाऊचा आफ्रिकेतल्या, अर्धपोटी भटकणाऱ्या आदिमातेशी काहीही संबंध नव्हता. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी मध्यपूर्वेतल्या सुपीक वळणावरचा (fertile crescent) माणूस शेती करायला लागला. त्याच्या धान्याच्या ढिगांत उंदीर माजले. तेव्हा मात्र मनीमावशीनं वाघोबाचं घर सोडून या मानव-भाच्याकडे बस्तान हलवलं. तेव्हापासून पुढल्या सगळ्या भ्रमंतीत मार्जारवंश मानववंशाच्या पावलावर पंजा टाकतच चालला. तसे जनुक-ठशांचे माग जागोजाग आढळले आहेत.

मानववंशाच्या या जनुक-आख्यानात खिल्लारं, पोटातले जंत (Tapeworms), पोटाचा अल्सर देणारे जंतू (H.pylori), मलेरियाचे जंतू, रक्ताचा कॅन्सर देणारे विषाणू या साऱ्यांच्या जनुकांची उपाख्यानं आहेत. मूळ कथेत त्या साऱ्यांनी हातभार लावलेला आहे.

जर सगळ्या मानव-जमातीची आदिमाय एकच होती तर आपण सारे इतके वेगवेगळे कसे दिसतो? मंगोलियन, कॉकेशियन, नीग्रॉइड हे भिन्न वंश नव्हेत का?

हे सारे काळे-गोरे-पिवळे वर्ण आधीच्या वानरसदृश प्राण्यांमधून निर्माण झाले असावेत ही अटकळ संशोधकांना होतीच. त्यांच्या उगमाचा जगभरातल्या वेगवेगळ्या शास्त्रांच्या अभ्यासकांनी एकजुटीनं शोध घेतला. त्यात त्यांनी मानववंशाच्या भौगोलिक इतिहासाचाही अभ्यास केला. त्यातूनच या मानवजातीच्या बहुरूपांमागचं रहस्य त्यांना उलगडलं.

साठ लाख वर्षांपूर्वी, वानर-मानव भेद निर्माण झाला. त्या काळात चिंपांझींप्रमाणेच मानवसदृशांच्या अंगावरही दाट केस होते आणि त्याखाली फिकट गोरी त्वचा होती. त्या केसाळ चादरीनं ऊब धरून ठेवली जाई. आफ्रिकेच्या उष्ण वातावरणात शरीराचं तापमान कमी ठेवणं जरुरीचं होतं. विशेषतः मानवसदृशांच्या वाढत्या मेंदूला अती उष्णतेचा त्रास होत होता. त्यासाठी त्यांच्या अंगावरचे केस झडणं आवश्यक झालं.

काही हजार वर्षांत ते केस झडून बारीक लव तेवढी राहिली. आतली गोरी त्वचा उघडी पडली. तिच्यात melanin हे संरक्षक रंगद्रव्य फार कमी प्रमाणात होतं. त्यामुळे आफ्रिकेतल्या प्रखर सूर्यप्रकाशातल्या अतिनील किरणांनी ती गोरी त्वचा भाजून निघाली. तिच्यातल्या रक्तवाहिन्यांतल्या फोलिक ॲसिड नावाच्या आवश्यक पोषक द्रव्याचा नाश झाला. शिवाय, तिच्यात कॅन्सरसारख्या व्याधी उद्भवल्या. त्यांतल्या त्यात जे सावळे लोक होते ते कातडीतल्या अधिकच्या melanin मुळे त्यातून निभावले. त्यांची प्रजा फोफावली. काही हजार वर्षांत त्वचेतलं रंगद्रव्याचं प्रमाण चढलं आणि त्याच्याशी निगडित असलेली जनुकंही वाढली. आफ्रिकेतला माणूस काळ्या रंगाचा झाला.

त्यानंतर त्या काळ्या माणसाचे वंशज आफ्रिकेतून बाहेर पडले. पुढची हजारो वर्षं जगभर भटकले. त्यांतली काही माणसं साधारण पस्तीस ते पंचवीस हजार वर्षांपूर्वी युरोपात पोचली. तिथला सूर्यप्रकाश प्रखर नव्हता. त्या सौम्य प्रकाशात अतिनील किरणही कमीच होते. तेही त्या काळ्या कातडीतल्या melaninमुळे कमी शोषले जात होते. त्वचेखाली ड जीवनसत्वाची निर्मिती करायला अतिनील किरणांची गरज असते. जोवर युरोपातला माणूस शिकार करत, फळं-मुळं गोळा करत वणवणत होता तोवर तो सतत उन्हात राहत होता. सौम्य प्रकाशातूनही पुरेसे अतिनील किरण त्याला मिळत होते. मग त्यानं शेती सुरू केली. उन्हातान्हातली वणवण कमी झाली. थोडक्या काळात पुरेसं ड जीवनसत्व तयार करायचं तर जास्तीत जास्त अतिनील किरण शोषणं भाग होतं. त्या गरजेपोटी त्वचेतलं melanin कमी कमी होत गेलं. काही सहस्रकांनंतर, सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी युरोपातली माणसं गोरी झाली. त्यांच्यातलं गोरेपणाचं जनुकही परमाणु-घड्याळाच्या गणितानुसार दहा हजार वर्षं वयाचंच आहे.

अतिपूर्वेतली उत्तरेची माणसंही अशीच

फिकी-पिवळसर झाली. पुन्हा उत्तर अमेरिकेतून दक्षिण अमेरिकेत उतरताना melanin वाढून मानवी कातडी तांबूस-सावळी बनली.

माणूस मंगोलियात पोचल्यावर तिथली थंडी आणि भणाणतं वारं यांच्याशी त्याला सामना करावा लागला. हजारो वर्षं चाललेल्या त्या धडपडीत त्याच्या चेहऱ्यात बदल होत गेला. फटीतल्या डोळ्यांना वाऱ्याच्या माऱ्याचा त्रास कमी झाला. दबलेल्या भुवया, वर आलेली गालफडाची हाडं आणि बसकं नाक यामुळे श्वासावाटे आत जाणाऱ्या हवेचा रस्ता चिंचोळा झाला. ती आत जाताना गरम होऊन गेली. नाकावाटे बाहेर पडणाऱ्या हवेबरोबर उष्णता आणि ओलावा बाहेर जाऊ नये ही काळजी घेता आली. चपट्या चेहऱ्यातल्या दातांची उभट ठेवण गोठलेलं मांस चावून चावून खाताना सोयीची झाली.

या साऱ्यांशी निगडित असलेली जनुकंही गरजेनुसार बदलत गेली. वर्ण (race) बदलले. पण जनुक-कुरमुऱ्यांचा चिवडा तोच राहिला. काजू-बेदाणे-हिरवी मिरचीही राहिली. काही ठिकाणी काजू अख्खे राहिले तर काही ठिकाणी अर्धे झाले. कुठे बेदाणे मोठे-टप्पोरे तर कुठे छोटे-छोटे. हिरवीच मिरची पण ती कधी उभी चिरून तर कधी बारीक तुकडे करून घातली. या प्रकारचेच फरक झाले. तेही सगळे एकाच वर्णात झाले नाहीत. त्यामुळे मूळ जनुकसंचयात पडणाऱ्या अशा फरकानं त्या माणसांचा वंश (species) बदलला नाही. आंतरवर्णीय (inter-racial) विवाहाची फळं सुदृढ, निकोप असतात. आंतरवंशीय (inter-species) संकर होणं कठीण असतं. झालाच तर संतती खेचरासारखी नपुंसक असते.

निळ्या डोळ्यांचं जनुक मात्र सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी एकाएकी, अपघातानं निर्माण झालं. सध्या जगात पसरलेल्या सगळ्या निळ्या डोळ्यांच्या माणसांमध्ये नेत्ररंगाचं ते एकमेव जनुक आहे आणि त्या जनुकाच्या आसपासचा जनुककोशाचा भागही त्या साऱ्यांमध्ये एकसारखाच आहे. संशोधकांनी त्या जनुकांचं मूळ शोधलं. त्यावरून त्या सगळ्यांची नीलाक्षी आदिमाय सीरिया-जॉर्डन किंवा तुर्कस्तान भागातली शेतकरीण असावी असा शास्त्रज्ञांचा कयास आहे.

एकत्र प्रवासामुळे आणि मुक्कामाच्या ठिकाणच्या हजारो वर्षांच्या सहनिवासामुळे जशी एकेका जनसमूहाची चेहऱ्याची ठेवण मिळतीजुळती झाली तसेच त्यांच्या जनुकांवर अवलंबून असलेले आनुवंशिक रोगही एकसारखे झाले.

सिस्टिक फायब्रोसिस हा फुप्फुसांचा जीवघेणा रोग युरोपीयनांच्यातच सर्रास

> 'मरणाने सुटका केली, जगण्याने छळले होते', असं कित्येक वृद्धांना खरोखरच वाटत असतं. आजारी, अपंग करणारं वार्धक्य कुणालाही नको असतं. मग म्हातारपण येतंच कशासाठी? या प्रश्नाचं उत्तर सगळ्या सजीवांच्या मूळ 'प्रोग्रॅम'मध्ये म्हणजेच DNA मध्ये शोधायचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न चालू आहे. या संशोधनात आतापर्यंत काय निष्पन्न झालं आहे ते आपण पुढच्या लेखात बघणार आहोत.

आढळतो. गुलाम म्हणून अमेरिकेत आणल्या गेलेल्या आफ्रिकन माणसांत रक्तदाबाचा विकार अधिक प्रमाणात दिसून येतो. दुधातली लॅक्टोज नावाची साखर युरोपीयनांना मानवते, पण बाकी सगळीकडच्या माणसांना ती पचत नाही आणि पोटात वात धरतो, जुलाब होतात. कोडीनसारख्या दुःखशामक औषधांचा कित्येक युरोपीयनांवर बरा-वाईट काहीही परिणाम होत नाही तर काही इतर देशांच्या माणसांना त्यानं अती झोप येते. एकाच गावात राहणाऱ्या भिन्न जमातींच्या रुग्णांवर उपचार करताना डॉक्टरांना हा वर्णभेद ध्यानात ठेवावाच लागतो.

जग दिवसेंदिवस लहान होत चाललं आहे. वेगवेगळ्या देशांतून आलेले, भिन्न रूपाचे, काळे-गोरे-लाल-पिवळे सारे आता आंतरराष्ट्रीय मानव्य-सूत्रानंही एकत्र गुंफले जात आहेत. अमेरिकेतल्या महा-विद्यालयांतल्या हुशार, गुणी विद्यार्थ्यांत आंतर्वर्णीय विवाह सर्रास होत आहेत. तशा जनुकीय मिश्रणामुळे पुढली पिढी अधिक निरोगी आणि कणखर जन्मते आहे.

तसं पाहिलं तर सख्खी भावंडंही अगदी एकसारखी दिसत नाहीत. प्रत्येकाचं रूप, गुण, स्वभाव, सारं जरा-जरासं का होईना, वेगवेगळं असतं. मानव-वंशाच्या शाखांचंही तसंच आहे. भिन्न दिसलो तरी DNA रोजनिशीतल्या नोंदी-पुराव्यांवरून आपण एकाच आदिमायेची लेकरं असल्याचं सिध्द झालं आहे. कठोर परिस्थितीला, कडाक्याच्या वातावरणाला, नैसर्गिक आपत्तींना तोंड देत मानववंश टिकून राहिला. त्यामुळेच त्याची उत्क्रांती आणि प्रगती झाली. हे सारं जनुक-रोजनिशीत नमूद केलेलं आहे. काही लाख वर्षं ही अद्भुत डायरी लिहिली जात राहिली आहे. अजून काही लाख किंवा कोटी वर्षं ती लिहिली जात राहील. आपलं सध्याचं अस्तित्व हे केवळ त्या रोजनिशीतलं खुणेचं बोट आहे. त्या बोटानं डायरी फाटता नये.

इथून पुढे त्या डायरीत काय लिहिलं जाईल ते आपल्या वागण्यावर अवलंबून आहे. अनमोल नैसर्गिक वारशाबद्दलची बेपर्वाई, पृथ्वीच्या खनिज-खजिन्याची उधळपट्टी, अधिकाची हाव, दळभद्री भाऊबंदकी अशांसारख्या अक्षम्य चुका करत राहिलो तर ती रोजनिशी कायमची मिटू शकते. तसं होऊ नये म्हणून जनुकीय इतिहासातून मिळणारा एकपणाचा, एकोप्याचा संदेश समजून घेऊया, मानव्याचं व्रत अव्याहत चालू ठेवूया. आदिमायेच्या लेकरांचं आज तेच कर्तव्य आहे.

**- डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjwalahd9@gmail.com

# एक पाक भेट

## चारुहास साटम

कराचीच्या कायदे आझम महम्मद-अली जिना आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलो तेव्हा मनामध्ये खेद आणि उत्सुकता अशा संमिश्र भावना होत्या. एकेकाळी केवळ भारताचा नव्हे तर चक्क मुंबई प्रांताचा भाग असलेल्या या शहरात मी 'परदेशी' म्हणून प्रवेश केला होता. गेली साठ वर्ष भारताला हाडवैरी मानणाऱ्या या देशात आपल्याला काय अनुभव येतात याची एक विलक्षण उत्सुकताही होती.


अपेक्षेप्रमाणे सुरुवात काही चांगली झाली नाही. माझ्या पासपोर्टवरचा दहा वर्षाचा अमेरिकेचा व्हिसा आणि मी जितक्यांदा अमेरिकेत गेलो तितके अमेरिकन इमिग्रेशनचे शिक्के बघून कराची इमिग्रेशन ऑफिसरच्या कपाळावर आठ्या पडल्या. तुम्हीसारखे अमेरिकेला का जाता, असा प्रश्न त्याने मला विचारला.

'तुझ्या बापाचं काय जातं?' असा खास मुंबई स्टाईल प्रश्न विचारावा असे माझ्या मनात आले. पण मी ती इच्छा दाबली, कारण एखादा पाहुणा आवडला नाही तर त्याला ताबडतोब पुढच्या विमानाने परत पाठवण्याचे अधिकार या इमिग्रेशन ऑफिसरांना असतात आणि अशा वेळी तुम्हाला आधी मिळालेला व्हिसा ते धुडकावून लावू शकतात याची मला कल्पना होती. त्यामुळे शक्य तितक्या नम्रपणे 'मी माझ्या व्यवसायासाठी अमेरिकेला जातो.' असे उत्तर त्याला दिले.

तुम्हाला अमेरिका आवडते का? असा त्याने पुढचा प्रश्न केला. मला माझा देश आवडतो, इतर देशांमध्ये मी फक्त कामासाठी जातो, असे मुत्सद्दी उत्तर मी त्याला दिले. त्यावर माझ्या पासपोर्टवर शिक्का मारून तो गालातल्या गालात हसला. पाकिस्तानात अमेरिकेबद्दल किती संताप आहे त्याची ही नुसती चुणूक मला बघायला मिळाली.

लहानपण पाकिस्तानात गेलेल्या मुंबईतील माझ्या एका सिंधी मित्राने पाकिस्तानी मेहमाननवाझी किती मोठी असते, याचे वर्णन करून सांगितले होते. विमानतळाच्या बाहेर पडलो तेव्हा त्याचे पहिले प्रत्यंतर आले. कराची प्रेस क्लब जे आमच्या दौऱ्याचे यजमान होते, त्यांनी अक्षरश: गुलाबाच्या पाकळ्यांचा वर्षाव आमच्यावर केला. टीव्ही चॅनेलवाले, पत्रकार, शाळकरी मुले-मुली, सिंध सरकारचे अधिकारी प्रचंड संख्येने विमानतळाच्या बाहेर उभे होते. आम्हाला पाहण्यासाठी आणि आमच्याशी हात मिळवण्यासाठी इतकी तोबा गर्दी लोटली की पोलिस आणि कमांडोंची तारांबळ उडाली. समोरच्या मॅक्डोनाल्डमधील कॉलेजकुमार आणि मुली आमच्या बसकडे अशा धावल्या की आम्हाला वाटले, आम्ही कुणी सेलिब्रेटी आहोत. रोषणाई, आतषबाजी, आमच्या स्वागताचे मोठमोठे बॅनर-फलक आणि आमच्या स्वागताच्या घोषणा या सर्वांनी विमानतळाचा आसमंत अक्षरश: दणाणून गेला. मुंबई प्रेस क्लब शिष्टमंडळाच्या पाकिस्तान दौऱ्याला अशी दणक्यात सुरुवात झाली .

बैठका, परिसंवाद, गाठीभेटी यांत पुढचे सात दिवस कसे गेले हे कळले सुद्धा नाही. कराची आणि मुंबई यांच्या संस्कृती-मध्ये असलेले फार मोठे साम्य हे कदाचित दौरा इतका सुंदर व्हायला कारणीभूत असावे. माझे आजोबा मराठा लाईट इंन्फ्रट्रीमधून लढलेले. १९३६ साली जवळजवळ आठ महिने त्यांनी कराचीमध्ये, खास कमांडो ट्रेनिंग घेतले होते. माझ्या लहानपणी कराचीच्या त्यांच्या रम्य आठवणी मी ऐकल्या होत्या. प्रत्यक्षात कराचीमध्ये फिरताना मलाही आपण मुंबईच्या बाहेर कुठे आहोत असे एकदाही वाटले नाही. मुंबईसारखीच कराची ही पाकिस्तानची आर्थिक राजधानी आहे. मुंबईसारखाच साठ टक्क्यांहून जास्त कर केंद्र सरकारला भरणारी आणि तरीही मुंबईसारखीच पाकिस्तानच्या केंद्र सरकारकडून उपेक्षित ठेवली गेलेली. सर्वसामान्य कष्टकरी मुंबईकरांना जसा दिल्लीवाल्यांचा राग असतो. तसाच राग कराचीकरांना इस्लामाबादवाल्यांचा आहे. 'कराचीशिवाय पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या सहा महिनेही टिकणार नाही', असे विधान माझ्याशी बोलताना कराचीतील एक ज्येष्ठ उद्योगपती महमद वासिम व्होरा यांनी केले. पाकिस्तान इतक्यांदा लष्करी टाचेखाली आला, लोकांचे मूलभूत हक्क तुडवले गेले, तरीही तो पुन्हा पुन्हा लोकशाहीकडे येत राहिल्याचे एकमेव कारण म्हणजे जुल्फिकार अली भुत्तो आणि त्यांची कन्या बेनझीर यांनी रचलेला उदारमतवादाचा आणि मानवी मूल्यांचा एक भक्कम पाया, असे कराची प्रेस



**सिंधचे मुख्यमंत्री कयुम अली शहा यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना लेखक चारुहास साटम**

क्लबचे अध्यक्ष  ताहीर हसन खान एकदा चर्चेच्या ओघात म्हणाले.

कराची, मुंबई, लंडन, न्यूयॉर्क या पोर्ट सिटीज आहेत. बंदरामुळे व्यापारउदीम होतो, रोजगार मिळतो, आर्थिक सुबत्ता येते, वेगवेगळे हुनर असणारे लोक देशाच्या किवा जगाच्या विभिन्न भागांतून तिथे येतात आणि मग त्या शहराची स्वतःची अशी एक वेगळी संस्कृती तयार होते ती त्या देशाच्या संस्कृतीच्या मानाने बरीचशी वेगळी असते. मुंबईसारखीच कराचीसुद्धा पारशी समाजानेच वसवली आणि त्या काळात पोटापाण्यासाठी कराचीमध्ये गेलेले मल्याळी, गोयकार, मराठी, गुजराती आणि स्थानिक सिंधी (हिंदू आणि मुसलमान दोघेही) कराचीमध्ये आज गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. गेल्या दशकात कराचीमध्ये अफगाण सीमेवरून मोठ्या संख्येने येणाऱ्या पठाणांबद्दल स्थानिक कराचीवाल्यांना भयंकर तिरस्कार वाटतो. संधी मिळेल तेव्हा या पठाणांना चोप देण्याचे काम एमक्यूएमचे तरुण कार्यकर्ते करताना दिसतात. या एमक्यूएमबद्दल थोडे विस्ताराने लिहायला हवे.

फाळणीच्या वेळी उत्तर प्रदेशआणि बिहारमधून जे मुसलमान पाकिस्तानात गेले त्यांना एके काळी पाकिस्तानात 'मोहाजीर' म्हणून हिणवले जायचे. या सापत्न वागणुकीबद्दल अल्ताफ हुसेन या तरुणाने दंड थोपटले आणि मोहाजीर कौमी मुवमेंट (एमक्यूएम) हा राजकीय पक्ष जन्माला आला आणि बघताबघता वटवृक्षसारखा वाढला. पुढे एकापाठोपाठ आलेल्या लष्करी राजावटींनी अल्ताफ हुसेनला भरपूर त्रास द्यायला सुरुवात केली तेव्हा त्यांनी लंडनमध्ये राजकीय आश्रय घेतला आणि आज गेली काही वर्षे तो लंडनमधूनच आपल्या पक्षाचा कारभार हाकतो. दरम्यानच्या काळात सुशिक्षित तरुणवर्ग मोठ्या संख्येने एमक्यूएमकडे आकर्षित झाला आणि मग पक्षाच्या नावातील मोहाजीर हा शब्द जाऊन तिथे मुत्ताहिदा (सर्वसमावेशक) हा शब्द आला. कराची महानगरपालिकेवर आज एमक्यूएमची सत्ता आहे. सिंध आणि फेडरल सरकारमध्ये सुद्धा ते भागीदार आहेत. एमक्यूएमची आजही कराचीमध्ये जबरदस्त दहशत आहे. इंटरनेट, संगणकीकरण, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंग अशा सगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून एक जबरदस्त जनसंपर्क यंत्रणा एमक्यूएमने कराचीमध्ये निर्माण केली आहे. अशी यंत्रणा पाकिस्तानातल्या इतर कोणत्याही राजकीय पक्षाकडे नाही. आणि म्हणूनच एकेकाळी उत्तर प्रदेश, बिहारमधून आलेल्या मुसलमानांच्या या पक्षात आज अशोक कुमार साधवानीसारखा हिंदू कार्यकर्ताही सापडतो. आणि अल्ताफ हुसेनच्या खालोखाल नंबर दोन वर असलेले नेते आहेत, गुजरातच्या कच्छमधून आलेले डॉ. फारुख सत्तार.


इकॉनॉमिक टाइम्सचे विनोद महंता आणि मी ज्या वेळी एमक्यूएमच्या मुख्यालयात जायला कारमध्ये  बसलो तेव्हा त्या ड्रायव्हरनेही, भाई लोगो के पास जा रहे हो क्या? असे मिश्कीलपणे विचारले. एमक्यूएमचे मुख्यालय 'नाईन झिरो' या नावाने ओळखले जाते. वस्तीच्या कोपऱ्या-कोपऱ्यावर स्टेनगन आणि एके-४७ घेतलेले एमक्यूएमचे कार्यकर्ते अहोरात्र पहारा देत उभे असतात. अनोळखी माणसाची कसून चौकशी केली जाते. मुख्यालयात शिरताना मेटल डिटेक्टर लावलेले आहेत. खुद्द एमक्यूएमनेच कराचीमध्ये हिंसाचाराचा जो हैदोस  मांडला होता तो सर्वांनाच ठाऊक आहे. एका बाजूला सफाईदारपणे इंग्रजी बोलणाऱ्या सुशिक्षित आणि तंत्रज्ञानाने आघाडीवर असलेल्या लोकांचा पक्ष आहे, तर दुसरीकडे हा टेरर कशासाठी? असा प्रश्न मी एका ज्येष्ठ नेत्याला खाजगीत विचारला. त्यावर अत्यंत थंडपणे तो म्हणाला, पाकिस्तानातल्या पंजाबी लोकांना आणि पठाणांना फक्त बंदुकीच्या गोळीचीच भाषा कळते. त्यामुळे आमच्याकडे जसे वस्तुनिष्ठ युक्तिवाद करणारे उच्चशिक्षित कार्यकर्ते आहेत, तसेच पठाणांच्या वस्तीवर हल्ला चढवून त्यांची गुर्मी उतरवणारी टपोरी पोरेही आहेत. म्हणूनच आम्ही मूळ भारतीय वंशाचे लोक आजही कराचीमध्ये पंजाब्यांच्या आणि पठाणांच्या छाताडावर पाय देऊन उभे आहोत.

कराचीत किमान ४०% लोकांची कुठल्या न कुठल्या नात्याने भारताशी नाळ जोडली गेलेली आहे. कुणाचे काका-काकी अजून भारतात आहेत, कुणाची मुलगी भारतात दिली आहे, तर कुणाची सून भारतातून आली आहे. ठाणावाला, पुनावाला, वांद्रेवाला अशा आडनावांचा बोहरी समाज मोठ्या संख्येने कराचीत आहे. पण दोन्ही सरकारांच्या आडमुठ्या धोरणामुळे व्हिसा मिळत नाही आणि भारताबरोबरचे हे नाते आम्ही अधिक घट्ट करू शकत नाही अशी खंत असंख्य कराचीकरांना आहे. सर्वसामान्य पोटार्थी माणसांना तर भारताबरोबरचे वैर कधी संपतेय

असे झालेय. त्यांना भारतासारखे व्हायचे आहे. कराची प्रेस क्लबचा एक पदाधिकारी फाझील जमिली गमतीने मला म्हणाला. सर्वसामान्य भारतीय माणसाला पाकिस्तानाबद्दल जेवढी माहिती आहे त्याच्या कितीतरी पटींनी जास्त माहिती सर्वसामान्य पाकिस्तानी नागरिकांना भारताबद्दल असते. याचे कारण हिंदी चित्रपट. १९९०च्या दशकात पाकिस्तानात गमतीने म्हटले जायचे की माधुरी दीक्षित आम्हाला द्या आणि काश्मीर तुम्ही घेऊन टाका. आजही हिंदी चित्रपटाची लोकप्रियता इतकी आहे, की फक्त माधुरी दीक्षितऐवजी ते करीना कपूर मागताहेत. शाहरुख, सलमान आणि अक्षयकुमार यांच्या तर चित्रपटांच्या तिकिटांची अजूनही ब्लॅकने विक्री चालते. जेव्हा जेव्हा २६/११ विषय निघाला त्यावेळेला उद्योगपतींपासून हॉटेलच्या वेटरपर्यंत प्रत्येकाची मान लाजेने खाली गेली. सर्वसामान्य मुंबईकरांमध्ये अजमल कसाब आणि त्याच्या गँगबद्दल जेवढा तिरस्कार आहे तेवढाच तो प्रत्येक कराचीकरच्याही मनात आहे. कसाबने घडवलेला हिंसाचार तीन दिवस पाकिस्तानातील वृत्तवाहिन्यांवर दिसत होता. हे मुंबईत जाऊन जर एवढे थैमान घालतात तर कराचीत काय करतील? या भयाने प्रत्येक काराचीकर थरथर कापतो. इतके असूनसुद्धा या दोन देशांची एकमेकांशी असलेली नाळ का घट्ट होत नाही याचे उत्तर पाकिस्तानातील ज्येष्ठ विचारवंत आणि कराचीतून प्रसिद्ध होणाऱ्या 'द हेराल्ड' मासिकाचे संपादक बदर आलम यांनी एका वाक्यात फार समर्पकपणे दिले आहे. ते म्हणाले, 'क्योंकि हुकुमते नहीं चाहती. अवाम को कौन पूछता है, कि उसे क्या चाहिये? ना आप के मुल्क में, ना हमारे मुल्क में!'

आम्ही गेलो त्याच काळात पाकिस्तानने भारताला 'मोस्ट फेव्हर्ड नेशन' म्हणून घोषित करण्याची तयारी दाखवली होती. फेडरेशन ऑफ पाकिस्तानी चेम्बर्स कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीच्या बैठकीत प्रस्तुत लेखकाने जेव्हा सांगितले की फक्त समझोता एक्स्प्रेस सुरू करून किंवा एकमेकांच्या मुलींशी लग्न करून दोन देशांमधले संबंध सुधारणार नाहीत, तर ते दोन देशांमधील व्यापार वाढल्याने आणि दोन्ही देशात आर्थिक समृद्धी आल्यानेच सुधारतील, तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. कराची चेम्बर्सचे अध्यक्ष मियां अब्रार अहमद यांचे विचार तर फारच सुरेख होते. ते म्हणाले, आज भारत-पाकिस्तानमध्ये अग्रक्रमाने सोडवण्याचे जे चार विषय आहेत- काश्मीर, सियाचीन, सरक्रीक आणि व्यापार. हा क्रम नुसता जरी उलट केला तरी काळाच्या ओघात व्यापाराबरोबर येणाऱ्या समृद्धीमुळे उरलेले तीन प्रश्न लोक विसरूनसुद्धा जातील. जपान समृद्ध झाल्यानंतर कोरिया समृद्ध झाला. कोरियानंतर तैवान समृद्ध झाला. अमेरिकेमुळे मेक्सिको समृद्ध झाला. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर हळूहळू पूर्ण युरोप भरभराटीला आला. थोडक्यात काय, तर एका देशात समृद्धीचे वारे वाहायला लागल्यानंतर ते हळूहळू शेजारच्याही देशात पसरतात. आज सिंध प्रांतात कराची बंदरापासून अवघ्या ४०० किलोमीटरजवळ १६४ बिलियन टन कोळसा सापडला आहे. काश्मीरवरून एकमेकांना गुरकावत बसण्यापेक्षा कच्छच्या वाळवंटात जर औष्णिक विद्युत प्रकल्प निर्माण केला तर दोन्ही देशांची विजेची टंचाई मिटेल, पण लक्षात कोण घेतो?


**वाचकदिनी प्रकाशित**




**अजब सहवास**

**गो.आ. भट**

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**


एक मात्र अतिशय चांगली गोष्ट झाली, ती म्हणजे कराचीमधल्या पत्रकारांची मने मुंबईमधील पत्रकारांशी चांगली जुळली. एकमेकांच्या देशाबद्दल लिहिताना आक्रमक भाषा वापरायची नाही असा ठराव झाला. आजच्या घडीला मुंबई प्रेस क्लब मार्चमध्ये येऊ घातलेल्या कराचीतल्या पत्रकारांच्या स्वागताची तयारी करीत आहे. बदर आलमच्या मते दोन्ही देशांच्या सरकारांवर त्यांचे पत्रकारच दबाव आणू शकतात. 'मने' आज किती बदलली आहेत. याचा एकच दाखला देतो. एका डिनरमध्ये इसलाउद्दिन सिद्दिकी भेटले. आता उतारवयाकडे झुकू लागलेला हा माणूस पाकिस्तानी हॉकी संघाचा माजी कर्णधार. १९८२ च्या आशियाई चषकाच्या अंतिम फेरीत इस्लाउद्दिनच्या पाकिस्तानी संघाने भारताचा सात-एक असा धुव्वा उडवला होता. भारतीय कर्णधार झफर इक्बालने जीवाची बाजी लावून खेळ केला, पण इस्लाउद्दिन शेवटी सरस ठरला. त्या सामन्याविषयी विचारले तेव्हा हा शांत, अबोल माणूस नम्रपणे म्हणाला, 'खरे तर त्या दिवशी अल्ला माझ्या बाजूने होता म्हणूनच आम्ही जिंकलो. नाही तर, झफरचा खेळ माझ्यापेक्षा कित्येक पटींनी सरस होता.' याचा अर्थ एकच इस्लाउद्दिनसारख्या जिगरबाज लोकांमध्ये तेव्हाही कटुता नव्हती आणि आजही नाही. तर मग आपण तरी ती का ठेवावी?


**– चारुहास साटम**

**लेखक हे मुंबईतील व्हॅल्युएबल उद्योगसमूहाचे संचालक आहेत.**

charu_satam@yahoo.co.in

## वाचकदिन वृत्तांत

२५ डिसेंबरची सायंकाळ! कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने ग्रंथालीच्या वाचकदिनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची आकर्षक शृंखला जुळून आली होती. मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन, माध्यमांचे वर्तमान सांगणारा परिसंवाद आणि आशयघन कवितांचा सांगीतिक काव्यसंगम, असा वाचकांचा, वाचकांसाठी आणि वाचकांना अंतर्मुख करायला लावणारा, त्यांच्याशी संवाद साधणारा हा साहित्योत्सव!

कार्यक्रमाची सुरुवात पुस्तक प्रकाशनांनी झाली. दिलीप पांढरपट्टे यांचे 'सव्वाशे बोधकथा', सुधीर आणि नंदिनी थत्ते ह्या लेखक दांपत्याचे 'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०११', जयश्री गोडसे अनुवादित 'अस्फुट आवाजांचा प्रदेश', गो.आ. भट लिखित 'अजब सहवास', शरद बेडेकरलिखित 'ईश्वरविरहित जीवन' आणि 'विचारवंतांचा विवेकविशेष' ही पुस्तके मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित झाली. यावेळी संबंधित लेखक-लेखिकांनी आपले पुस्तकाविषयीचे मनोगत व्यक्त केले.

मराठी-उर्दू गझलकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या दिलीप पांढरपट्टे यांनी गझलनिर्मितीच्या पद्यरचनेच्या प्रांतातून 'बोधकथे'च्या निमित्ताने वेगळ्याच गद्यप्रकारात लेखनास आरंभ केला. त्याविषयीचा अनुभव आणि दै. सकाळमध्ये बोधकथा प्रकाशित व्हायला लागल्यानंतर मिळालेली अमाप प्रसिद्धी याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि गझलेपेक्षा बोधकथांमुळे आपण घराघरात पोचलो; असे प्रांजळपणे कबूल केले. तसेच 'ग्रंथाली' ह्या प्रकाशन संस्थेशी वाचक म्हणून जुळलेले नाते हळूहळू बदलत, प्रत्येक वेळी अनुकूल वळणे घेत, लेखक इतकेच नव्हे; तर ग्रंथालीचाच घटक बनेपर्यंत कसे रूपांतरित होत गेले याविषयी सांगितले.

'व्हिस्परिंग लँड' ह्या इंग्रजी कथा-संग्रहाचे अनुवादित पुस्तक 'अस्फुट आवाजांचा प्रदेश'. डॉ. जयश्री गोडसे आपल्या ह्या अनुवादाविषयी अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, की आफ्रिकेतल्या स्त्रियांच्या आत्मकथा आणि भारतीय स्त्रियांचे जीवन यात कुठेतरी साम्य आहे. लेखनविषयक अनुभव नसलेल्या स्त्रियांनी लिहिलेल्या ह्या कथा, म्हणजे त्या त्या स्त्रीचे छोटेखानी आत्मकथन असून प्रत्येक वाचकाने ह्या कथा वाचाव्या असं आवाहनही त्यांनी केलं.

साहित्यिकांच्या सहवासात राहिलेल्या गो.आ. भट यांनी, विशेष मान्यवर, प्रसिद्ध व्यक्तींच्या, साहित्यिक कलावंतांच्या जीवनातील त्यांना आलेले अनुभव, ह्या पुस्तकात लेखरूपाने संकलित करून 'अजब सहवास' हे पुस्तक निर्माण केलेय. पुस्तकाविषयी त्यांचे मनोगत त्यांच्या सुनेने वाचून दाखवले.

'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०११' ह्या पुस्तकाविषयी सुधीर थत्ते यांनी माहिती दिली. अनौपचारिक पद्धतीने त्यांनी पुस्तकाविषयी सांगितले. विचारवंतांचा विवेकविशेष आणि ईश्वरविरहित जीवन (दोन खंड) ह्या शरद बेडेकरलिखित पुस्तकांचे प्रकाशन झाले. यावेळे बेडेकर यांनी ''आस्तिक आणि नास्तिक अशा सर्वांनीच माझी ही पुस्तके वाचावीत'' असे आवाहन केले. ''मी नास्तिक कसा झालो यावरचं हे लेखन कोण प्रकाशित करणार असा मला जो प्रश्न पडला होता, तो ग्रंथालीने सोडवला याचे समाधान वाटते; त्याचबरोबर अभिमानही वाटतो'', असे भावपूर्ण उद्‌गार काढले.

कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन. मगरे म्हणाले, की वाचकदिनाचा हा कार्यक्रम ग्रंथाली आणि कीर्ती महाविद्यालय ह्या दोन संस्थांचा मिळून आहे. त्यामुळे ग्रंथालीने याविषयी कोणताही औपचारिकपणा ठेवू नये. प्राचार्य व्ही.एन मगरे यांनी ग्रंथालीच्या प्रस्तुत प्रकाशन सोहळ्यातील पुस्तकांविषयीही आणि त्यातील विचारवैशिष्ट्यांबद्दल श्रोत्यांना भरभरून माहिती दिली. त्यांचे भाषण कीर्ती आणि ग्रंथालीच्या दृढ नातेसंबंधांना अधोरेखित करणारे ठरले.

पुस्तक प्रकाशन सोहळ्याप्रसंगी पुस्तकांच्या लेखक-लेखिकांबरोबर छाया दातार, कवयित्री नीरजा ह्याही मंचावर उपस्थित होत्या. यावेळी ग्रंथालीतर्फे कीर्ती महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी सप्रेम भेट म्हणून ४० पुस्तकांचा संच प्राचार्य व्ही.एन. मगरे यांच्याकडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रचालन लतिका भानुशाली यांनी केले. त्यापूर्वी विनायक गोखले यांनी वार्षिक आढावा घेत ग्रंथालीच्या पुस्तकांची व योजनांची माहिती दिली.

श्रोते आणि रसिक वाचक ज्या कार्यक्रमाची उत्सुकतेने वाट पाहत होते, तो माध्यमांचे वर्तमान सांगणारा अर्थात 'बदलते सामाजिक-आर्थिक संदर्भ आणि माध्यमांपुढील आव्हाने' या विषयावरचा परिसंवाद सुरू झाला. ग्रंथालीने निमंत्रित केलेले पाचही संपादक मंचावर उपस्थित राहिले होते. पैकी तीन वृत्तपत्रांचे तर दोन वृत्तवाहिन्यांचे! ह्या कार्यक्रमागची भूमिका ग्रंथालीचे सचिव पद्मभूषण देशपांडे यांनी मांडली. नाटककार, कादंबरीकार अभिराम भडकमकर यांनी सूत्रसंचालन केले.

लोकसत्ताचे गिरीश कुबेर यांनी पत्रकारांमध्ये असलेल्या उथळपणाबद्दल चीड व्यक्त केली. ''कण्टेण्ट असणारा सर्वसमावेशक, सविस्तर मजकूर लोकांपर्यंत पोचवायला मीडिया कमी पडतो. त्यासाठी (ज्ञान हा मोठा शब्द आहे) पण निदान माहितीचा किमान साठा तरी पत्रकारांजवळ असायला हवा'', असे त्यांनी आग्रहाने नमूद केले. संपादक आणि मालक एक नसलेलेच बरे! मालकाला वृत्तपत्र चालवायला लागणारी

झगझग संपादकामागे नसली तरच तो संपादकीय जबाबदारी नीटपणे सांभाळू शकेल ह्या कुबेरांच्या मताचं खंडन करत, नवाकाळच्या संपादक जयश्री खाडिलकर-पांडे म्हणाल्या, की ''संपादक जेव्हा मालकही असतो तेव्हाच तो मनासारखे निर्णय घेऊ शकतो. अन्यथा मालकाच्या निर्देशाप्रमाणे बातम्या फिरवल्या जातात, वगळल्या जातात. लेख लिहिले जातात किंवा त्यांच्या धोरणात बसत नसतील तर बाजूला ठेवले जातात. संपादक हाच मालक असेल तर तो चळवळींच्या बाजूने लिहू शकतो. सामान्य जनतेच्या व्यथांना तो आपल्या वृत्तपत्रात जागा देतो.''

खाडिलकरांच्या ह्या मतावर लोकमतचे विवेक गिरधारी म्हणाले, की ''वृत्तपत्रात असो, किंवा कोणत्याही मीडियात; महत्त्वाचा निर्णय हा एकटा मालक घेत नाही तर तो निर्णय त्या माध्यमसंस्थेच्या विविध पातळ्यांवर चर्चा करून घेतला जातो.'' इतर काही संपादकांनीही खाडिलकरांच्या मताचे खंडन करत म्हटले, की ''संपादक हाच मालक असेल तरच ते वृत्तपत्र सामान्य माणसांच्या बाजूने लिहितं आणि इतर वर्तमानपत्रं सामान्य माणसाकडे, चळवळींकडे दुर्लक्ष करतात असा काही आजवरचा इतिहास नाही. त्यामुळे हे म्हणणे निराधार आहे.'' गिरीश कुबेर ह्यांनीही लागलीच प्रतिक्रिया देत म्हटले, की ''संपादकांच्या निर्णयात मालक हस्तक्षेप करतात असा काही आपल्याला अनुभव नाही आणि असे जरी कुठे असेल तर आपण तरी अशा प्रकारच्या वर्तमानपत्रात आजपर्यंत काम केलेलं नाही.''

माध्यमांचे वर्तमान सांगणारा परिसंवाद चांगलाच रंगत होता. समोर बसलेल्या वाचक-रसिक-श्रोत्यांना एक नवे बौद्धिक खाद्य यातून मिळत होते. वर्तमानपत्राचा खप किंवा वृत्तवाहिन्यांचा टीआरपी सांभाळताना करावयाची कसरत याबाबत सूत्रसंचालक अभिराम भडकमकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विवेक गिरधारी यांनी अशी माहिती दिली, की ''हे एक पॅकेज असतं. एखाद्या थाळीत जसं गोड, आंबट, तिखट, तेलकट असतं, तसं सर्वांसाठी, सर्व वयाच्या लोकांसाठी मीडियाला द्यावं लागतं.'' यावर इ टीव्हीचे संपादक राजेंद्र साठे हे आक्षेप घेत म्हणाले, की ''टीआरपीसाठी किंवा वृत्तपत्राच्या खपासाठी काही गोष्टी कराव्या लागतात हे खरं असलं, तरी निदान पत्रकाराने तरी अशी पॅकेजची भाषा बोलून आम्ही विक्रेत्याच्या भूमिकेत आहेत असे भासवू नये.'' ह्यावर गिरधारी यांनी, ''पॅकेजचा अर्थ असा न घेता एकच बातमी दहा प्रकारे दहा प्रकारच्या वृत्तसंस्थांद्वारे कशी येते हे दाखवणं म्हणजेही पॅकेजच'' असं सांगत सावरण्याचा प्रयत्न केला.

आर्थिक संदर्भाबाबत बोलताना विवेक गिरधारी पुढे म्हणाले, की ''गडचिरोलीतल्या लाखांच्या वाचकांपेक्षा नागपूरच्या रामदासपेठेतील हजारोंच्या संख्येतील वाचक मीडियाला जास्त मोलाचा वाटतो. कारण जाहिरातींना वगैरे तो वाचक, (अर्थपूर्ण) प्रतिसाद देत असतो. साऱ्याच मीडियाचे अशा वाचकाकडे/प्रेक्षकाकडे लक्ष असते. यावर परिसंवादाचे सूत्रसंचालक अभिराम भडकमकर आक्षेप घेत म्हणाले, ''ग्रामीण भागातील वाचक माध्यमे नाकारतात का? माध्यमे ही मोजक्या मूठभर श्रीमंत वाचकांसाठीच असतात का? यावर जयश्री खाडिलकर यांनी, नवाकाळ हे वृत्तपत्र शहरात गिरणी कामगरांची तर ग्रामीण भागात शेतकरी आंदोलनाची बाजू कशी उचलून धरते याविषयी माहिती सांगितली. खाडिलकर यांचे वाक्य तोडत गिरीश कुबेर यांनी सवाल केला की ''तुम्हाला राजू शेट्टींचं आंदोलन मान्य आहे काय? त्याचबरोबर राजू शेट्टींचं म्हणणं मान्य केलं तर शहरात कांदा ८० रु.ने विकावा लागेल त्याचं काय?'' ह्या प्रश्नांवर खाडिलकर म्हणाल्या, ''शेतकरी जगवायचा असेल तर शेती उत्पादनांना योग्य किंमत द्यायला हवी. जर शहरी लोक ७० रु.ची तिकिटं १५० रु. ब्लॅकच्या दराने घेतात, तर कांद्याला ८० रु. किलोला द्यायलाही परवडलं पाहिजे.''

'स्टार माझा'चे संपादक राजीव खांडेकरही पत्रकार प्रशिक्षणाच्या बाजारू-पणाबद्दल आणि त्यातील अपप्रवृत्तींबद्दल बोलले. तरुण मुलंसुद्धा चांगलं काम करताहेत असं जेव्हा गिरीश कुबेर म्हणाले, तेव्हा राजीव खांडेकर यांनी आपला अनुभव सांगितला. ते म्हणाले, ''आम्ही जेव्हा 'स्टार माझा'साठी पत्रकारांचा शोध घेतला तेव्हा हजारो उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या आणि त्यातील तीस निवडक पत्रकार निवडले. मात्र यावेळी असं लक्षात आलं, की ज्यांनी पत्रकार म्हणून प्रशिक्षण घेतलं आहे त्यांच्यापेक्षा जे खरोखर मनापासून 'पत्रकार' ही वृत्ती ठेवतात, ते पत्रकारितेचं प्रशिक्षण न घेतल्याचा बाऊ करून, न्यूनगंड बाळगून पत्रकारितेपासून दूर राहतात. पत्रकारितेचा डिप्लोमाच हवा असा आग्रह आम्ही मात्र ठेवला नाही.''

चंगळवाद, बातम्यांच्या लाटा (फॅड), हिंदी चॅनेल्स, परदेशी वृत्तवाहिन्या यांवरही परिसंवादात कमी-जास्त खल झाला. रोचक-बोचक चर्चा जशी रंगली तशी ती श्रोतृवृंदालाही समाधान देऊन गेली. एकूणच माध्यमांचे वर्तमान सांगणारा परिसंवाद चांगलाच गाजला.

त्यानंतर प्रसिद्ध गायिका निशा पारसनीस ह्यांचा काव्यसंगम हा कार्यक्रम श्रोत्यांची दाद मिळवून गेला.

आलेल्या प्रत्येकाला ग्रंथालीतर्फे झुणका-भाकर या अस्सल महाराष्ट्रीय थाळीचा आस्वाद घेता आला. ग्रंथालीने लावलेल्या पुस्तकविक्रीच्या स्टॉलचाही वाचकांनी लाभ घेतला. यावेळी 'आठ हजार रुपये किंमतीचा गेल्या वर्षात प्रसिद्ध झालेल्या ४० पुस्तकांचा संच चार हजार रुपयांत मिळेल', अशी वाचकप्रिय घोषणाही ग्रंथालीतर्फे करण्यात आली.

**- दत्तात्रय सत्यविजय भालेकर**
प्रतिनिधी

# ठाणे केंद्र वाचकदिन – एक आंनदोत्सव

**प्रभाकर भिडे**

१७/१८ डिसेंबर २०१० रोजी, ठाण्याच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सहयोगाने ग्रंथालीचा वाचकदिन उत्साहाने व मुलांच्या उत्स्फूर्ततेने ठाणे येथे साजरा झाला. ग्रंथालीचा ठाणे केंद्राचा वाचकदिन हा शालेय मुलांसाठी (विशेषत: ५वी ते ९वी पर्यंतच्या) असतो. वाचक चळवळीचा मूळ उद्देश 'वाचनप्रसार'. त्याची सुरुवात शालेय वयापासून व्हावी ही त्यामागची भावना आहे. छोट्यांसाठी ते बालसाहित्य संमेलन असते. कधी कवयित्री शांताबाई शेळकेच्या काव्यप्रतिभेचा विषय असतो, कधी समग्र आचार्य अत्रे या प्रसिद्ध साहित्यिकाच्या वाङ्मयाचा विषय असतो. उद्देश एकच मुलांना मराठी साहित्याची, वाचनाची गोडी लागावी.

यावर्षी सानेगुरुजींच्या 'श्यामची आई' या चिरंतन साहित्यकृतीला ७५ वर्षे झाली. या अमृत महोत्सवाचे निमित्त साधून ठाण्यातील ३०-३५ शाळांना 'श्यामची आई' या कादंबरीतील विविध घटना व प्रसंगाचे नाट्य सादरीकरण असा विषय सुचवला. मग त्यासाठी संयोजक अविनाश बर्वे व श्रीधर गांगल यांची विविध शाळांमधून जाऊन मुलांना विषयाची कल्पना, मार्गदर्शन व सूचना सुरू झाल्या. सुरुवातीचा प्रतिसाद जरा थंड असतो, पण मग मुलांचा उत्साह पाहून शाळा, शिक्षक व पालक यांचा सहभाग सुरू होतो.

यातूनच सानेगुरुजींच्या समग्र साहित्याचा शोध व वाचन सुरू होते. सानेगुरुजींचे सर्व साहित्य संस्कृतीसंवर्धक व ओळख करून देणारे आहे. विशेषत: 'श्यामची आई' यामध्ये तर प्रत्येक आईने मुलांवर कसे संस्कार करावे याचा आदर्श नमुना आहे. त्याकरता श्यामची खेळाची आवड, पोहायला शिकणे, ते थेट आईंच्या निधनापर्यंतचे प्रसंग (विविध रात्रींमध्ये) गुंफलेले आहेत. मुलांना प्राण्यांबद्दल भूतदया शिकवणे, प्राण्यांविषयी प्रेम, इतरांबद्दल माणुसकी यांची सुंदर गुंफण करण्यात आली आहे. इतक्या घटना व प्रसंग या पुस्तकात आहेत की त्यातल्या कुठल्या घटना किंवा प्रसंगाचे सादरीकरण करावे असा प्रश्न पडावा.

असे सांगतात, की स्वातंत्र्यलढ्यामध्ये सानेगुरुजी तुरुंगात असताना जो मोकळा व शांत वेळ मिळाला त्यामध्ये त्यांनी ७/८ दिवसांत हे पुस्तक पूर्ण केले. त्यामधून त्यांच्या प्रतिभेचा दिव्य आविष्कार घडतो.

सुदैवाने या कार्यक्रमाचे उद्घाटन मधू नाशिककर या गेली ५० वर्षे सानेगुरुजीप्रेमी व त्यांच्या साहित्याचा प्रसार करणाऱ्याकडून झाले हा एक चांगला योग आला. तसेच याप्रसंगी ग्रंथालीचे व सध्या थिंक महाराष्ट्र डॉट कॉमचे संपादक दिनकर गांगल यांनी 'सानेगुरुजी डॉट काम' या वेबसाईटचे उद्घाटन केले. कुणाला समग्र सानेगुरुजींच्या साहित्याची ओळख करून घ्यायची असेल तर ही वेबसाईट पाहावी. सानेगुरुजींची ८०च्या वर पुस्तके या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. आता वैज्ञानिक नवीन नवीन शोधामुळे ज्ञान हे कोणाची मक्तेदारी नाही हे सिद्ध झाले. तसेच ते सर्वसामान्यांना सहज उपलब्ध आहे. यावेळी ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचे मा.य. गोखले, पा.के. दातार व इतर सदस्य आवर्जून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते मुलांना पुस्तके भेट देण्यात आली.

यामध्ये पहिल्या दिवशी जवळजवळ वीस शाळांनी सादरीकरण केले. विशेष नेपथ्यकार नसतानाही मुलांच्या उत्स्फूर्ततेने व निरागसतेने बहुतेक सादरीकरणे अतिशय गोड व हृद्य वाटली. सर्वांचे पाठांतर चांगले होते. तसेच सादरीकरण सर्वांनीच अतिशय धिटाईने केले.

**श्यामची आई सादरीकरण–**

**न्यू कलवा हायस्कूल** – रात्र एकविसावी – आजी वडिलांना सांभाळण्याकरता आमच्याकडे राहण्यास आली. तिला भीती माहीत नव्हती. कोणी आजारी पडली की आजी मदत करे. कुणाच्या पोटात दुखले की आजी तेल चोळे, यातून एकमेकांना उपयोगी पडण्याची भावना वाढीस लागते.

**मो.ह. विद्यालय** – बाबांनी मुलांना सणानिमित्त नवीन कपडे शिवले, पण स्वत:ला व आईला कधीच नवीन कपडे घेत नाहीत, ही त्यागाची भावना शिकवते.

**एकलव्य परिवर्तन विद्यालय** – श्याम फुलांऐवजी कळ्या तोडतो. आई त्याला ओरडते. तो आईच्या पाया पडतो. आई त्याला जगाला प्रेम अर्पावे हे नितांत सुंदर गीत म्हणायला सांगते. संस्कारक्षम वयात अशा गोष्टींचा चांगला उपयोग होतो.

**शाळा क्रमांक पाच** – ठाणे म्युनिसिपल स्कूल – या कथेत पुरुषांच्या बरोबर स्त्रियांना

समान अधिकार आहेत हे सांगितले आहे. तसेच दळण दळण्याकरता लहानपणी श्याम आईला मदत करतो हे दाखवले आहे.

**वर्तकनगर माध्यमिक शाळा** – रात्र २३ वी, २४ वी या शाळेने चार-पाच विविध घटनांवर आधारीत सादरीकरण केले. यामध्ये स्त्री-पुरुष समानता, आईला श्याम मदत करतो, अर्धनारीनटेश्वर हे स्त्री-पुरुषाचे रूप आहे, देवाला १०८ फुले व बेलाची पाने वाहणे वगैरे संस्कार दाखवले आहेत.

**माजीवडा हायस्कूल** – दिवाळीत आनंदात कसे राहायचे हे दाखवले आहे.

**श्रीराम विद्यालय** – वडील श्यामला खरसव घेऊन शाळेत येतात त्यावेळी वडिलांच्या गबाळा वेष बघून श्यामला प्रथम लाज वाटते. पण त्याला आपली चूक कळते. सर्वजण मिळून खरवस खातात.

**बालविद्यामंदिर** – वाचनाचे महत्त्व यासंबंधीचा प्रसंग मुलांना अंतर्मुख करतो. विविध विषयांवर शाळेची मुले प्रश्न विचारतात.

**किसनगर शाळा, म्युनिसिपल स्कूल** – बहीण पैसे साठवून श्यामला कोट शिवते हा प्रसंग बहीणभावाचे प्रेम दाखवतो.

**श्रीरंग विद्यालय** – स्वावलंबाने शिक्षण यावर आधारीत प्रसंग. रोज झोपाळ्यावर बसून रामरक्षा व परवचा म्हणणे.


**शाळा क्रमांक दोन** – विश्वाचा/सृष्टीचा ग्रंथ निसर्गात जाऊन वाचावा. तसेच निमूटपणे कसे जेवावे, वाढलेल्या पदार्थांना नावे ठेवू नये वगैरे संस्कार प्रसंगातून दाखवले आहेत. असे महाराष्ट्र विद्यालय, ज्ञानप्रसारिणी शाळा, शिवसमर्थ विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, नौपाडा स्कूल, बेडेकर विद्यामंदिर, सरस्वती शाळा अशा अनेक शाळांनी सादरीकरण केले. पण सरस्वती मराठी शाळा, ए.के. जोशी हायस्कूल वगैरेंची सादरीकरणे विशेष लक्षात राहिली.

एकंदरीत श्यामची आई हे पुस्तक मातृप्रेमाचे महान मंगल सूत्र आहे हे मुलांना कळले. दुसऱ्या दिवशी मराठी ग्रंथ संग्रहालयाचे कार्यवाह पद्माकर शिवलकर आले होते. त्यांच्या हस्ते सर्व मुलांना ग्रंथालीतर्फे पुस्तके भेट देण्यात आली.

**– प्रभाकर भिडे**
बी-२०१ यमुना माधव सोसायटी,
सावरकर रोड, डोंबिवली (पूर्व)
भ्रमणध्वनी – ९८९२५६३१५४


## वाचकदिनी प्रकाशित झालेली पुस्तके

**अस्फुट आवाजांचा प्रदेश**
स्वैर अनुवाद – **डॉ. जयश्री गोडसे**





**मूल्य १८० रु.**
**सवलतीत १०० रु.**

**सव्वाशे बोधकथा**
**दिलीप पांढरपट्टे**




**मूल्य १२० रु.**
**सवलतीत ७५ रु.**

**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०११**
**सुधीर थत्ते-नंदिनी थत्ते**




**मूल्य ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**

# वाचकदिन क्षणचित्रे...



लतिका भानुशाली
निवेदन करताना



जयश्री गोडसे



शरद बेडेकर



सुधीर थत्ते



दिलीप पांढरपट्टे



प्राचार्य व्ही.एन. मगरे
कीर्ती कॉलेज



पुस्तक प्रकाशनसमयी – गो.आ. भट, दिलीप पांढरपट्टे, शरद बेडेकर, प्राचार्य मगरे, छाया दातार, नीरजा, सुधीर–नंदिनी थत्ते आणि डॉ. जयश्री गोडसे



बा.भ. बोरकर, ना.घ. देशपांडे आणि कुसुमाग्रज यांच्या कवितांवर आधारित काव्यसंगम सादर करताना निशा पारसनीस. निवेदन भाऊ मराठे



RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011

RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया

## 100 वर्षांपासूनी लक्षावधी भारतीयांच्या आकांक्षासंगे धावे वेगे वेगे !




## आणि ती वाटचाल अव्याहत सुरूच आहे...

आमच्या थेट स्थापनेपासूनच, आमच्या जनक संस्थापकांच्या दूरदृष्टीला अनुसरून, आम्ही भारतातील लोकांच्या आर्थिक गरजांसाठी सतत नानाविध अभिनव मार्ग उदयाला आणले.

जसं की, पहिला सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ते आवर्ती ठेवी आणि बचत उत्पादने. गृह कर्जे आणि शैक्षणिक कर्जे ते सर्व प्रकारची व्यवसाय आणि व्यापारउदीम कर्जे. आर्थिकदृष्ट्या वंचितांसाठी टेक्नॉलॉजी एनेबल्ड ऑफरिंग्ज ते बायोमेट्रिक सोल्यूशन्स.

कुटुंबांना सुरक्षा आणि आत्मविश्वास बहाल करण्यासाठी आम्ही लावतो मोलाचा हातभार. सुधारतो जीवनशैली, उद्योगधंदे अणि शेतीला ठेवतो गतिमान. तर बँक व्यवहाराशी आजवर संबंध न आलेल्यांना आणतो मुख्य प्रवाहात.

आमच्या कारभाराचे 100 वे वर्ष साजरे करताना , भारतीयांच्या बदलत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आम्ही नव्या उमेदीने कटिबद्ध होत आहोत, सर्व कष्टकरी लोकांचे वैयक्तिक जीवन सुधारण्यासाठी तसेच देशाला संपन्न बनवण्यासाठी.

***साजर आहे भारताचे दुर्दम्य चैतन्य 100 वर्षांसाठी. 1911-2011***

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
Central Bank of India
1911 पासून तुमच्यासाठी "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

www.centralbankofindia.co.in
टोल फ्री : 1800 200 1911

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.